# स्पंदन २००८-०९

तयांचे व्यर्थ न हो बलिदान



श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री



# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर



मराठी विभागाच्यावतीने आयोजित काव्यवाचन
कवी सुरेश मोहिते यांचा ''मजेत जगावे वाहत जगावे'' हा कार्यक्रम



हिंदी सप्ताह सांगता समारंभामध्ये मार्गदर्शन करताना
डॉ. पी. एस. पाटील (माजी हिंदी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू



लीड कॉलेज अंतर्गत पेपरवाचन स्पर्धेत
प्रास्ताविक करताना प्रा. एस. ए. साळोखे



स्पर्धा परीक्षा कार्यशाळा व एम.पी.एस.सी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या
सत्कार समारंभात प्रास्ताविक करताना प्रा. एन. एम. पाटील



सदिच्छा समारंभामध्ये मार्गदर्शन करताना प्रा. डी. एन. पाटील



रिसर्च पेपर प्रेझेंटेशन करताना श्री. एस. ए. गंगावने सोबत
डॉ. व्ही. जे. फुलारी, व्ही आय टी युनिव्हर्सिटी वेल्लोर (तामिळनाडू)

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)
संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

• वार्षिक अंक सोळावा

# स्पंदन

## सन २००८ - ०९

### संपादक मंडळ

प्रमुख संपादक
प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर

कार्यकारी संपादक
प्रा. डॉ. एस. डी. पाटील

विभागीय संपादक
प्रा. डॉ. एस. डी. पाटील, मराठी विभाग
प्रा. डॉ. एस. वी. देसाई, हिंदी विभाग
प्रा. सी. वाय. जाधव, इंग्रजी विभाग
प्रा. डॉ. एस. जी. गायकवाड, शास्त्र विभाग

# स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा. केशवराव शंकरराव पाटील |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. एकनाथ माणकोजी निकम |
| सदस्य | : | मा. जी. डी. पाटील |
| मुख्य सचिव | : | मा. एस. एस. चौगले |
| सचिव | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. डॉ. एस डी. पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. एस. आर. पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. एस. के. सावंत |
| शिक्षकेतर प्रतिनिधी | : | श्री. नामदेव विष्णू पाटील |


रजि. नं. KPR / KGL / RSR (CR) 2266/99 स्थापना : १५/१०/१९९

## श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था

विद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर

आकर्षक व्याज दर (द. सा. द. शे.)
मूदतबंद ठेव :
४६ दिवस ते १२ महिने - १०%
१३ महिने ते २४ महिने : १०.५%
२५ महिने ते ४८ महिने : ११%
४९ महिने ते ६० महिने : ११.५%
रिकरिंग ठेव : १०%
दामदूप्पट ठेव : ९ वर्षे

सभासद हित, तत्पर सेवा

ठेवी : ४८.९० लाख
कर्जे : ८२.९७ लाख
फंडस् : ५.८८ लाख
गुंतवणूक : ६.६५ लाख

सभासद व बिगर सभासद यांचेकडून ठेवी स्वीकारल्या जातील.

चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, मॅनेजर व सर्व सभासद

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)




**मान.आमदार श्री.के.पी.पाटील**

अध्यक्ष,

श्री दूधगंगा-वेदगंगा सह.साखर कारखाना लि.बिद्री

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री

**मान.सौ.मायावती के.पाटील**

अधिसभा सदस्या,

शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर





**मान. केशवराव शं. पाटील**

उपाध्यक्ष,

श्री दूधगंगा-वेदगंगा सह.साखर कारखाना लि.बिद्री

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री

**मान. डॉ. आर. एल. राजगोळकर**

प्राचार्य,

श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री



# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)

## संस्था पदाधिकारी



मा. श्री. आर. डी. देसाई
कार्य. संचालक, बिद्री कारखाना व
मानद सचिव, श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



मा. श्री. एस. एस. चौगले
मुख्य सचिव, बिद्री कारखाना व
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



मा. नामदेवराव शं. भोईटे



मा. गणपती ज्ञा. पाटील



मा. विठ्ठलराव शि. खोराटे



मा. केरबा द. पाटील



मा. राजेंद्र पां. पाटील



मा. नेताजी कुं. पाटील



मा. पंडीतराव द. केणे



मा. के. जी. नांदेकर

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)



मा. दिनकरराव भा. जाधव



मा. गणपती गुं. फराकटे



मा. सुनिलराज सु. सुर्यवंशी



मा. बंडोपंत कृ. पाटील



मा. बाजीराव ई. गोधडे



मा. शशिकांत आ. पाटील



मा. सौ. सुवर्णा सं. पाटील



मा. सौ. सविता भि. एकल



मा. रमेश मा. वारके



मा. मधुकर गो. जाधव



मा. सुनिलराव शि. कांबळे



मा. ए. वाय. पाटील

# राष्टीय सेवा योजना



सदगुरु बाळुमामा मंदिरात साफसफाई करताना स्वयंसेवक



शिंदेवाडी येथील श्रमसंस्कार शिबिरात श्रमदान करताना स्वयंसेवक



शिंदेवाडी येथील शिबिरात झालेला महिला मेळावा



मांगोली येथे झालेल्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करताना संस्थाध्यक्ष



मांगोली शिबिरात श्रमदान करताना स्वयंसेवक



मांगोली शिबिरात श्रमदान करताना स्वयंसेवक



मांगोली शिबिरात स्वयंसेवकाना मार्गदर्शन करताना मा. नेताजीराव पाटील (संचालक, बिद्री कारखाना)



मांगोली शिबिरात लघुनाटीका 'लेक वाचवा' सादर करताना स्वयंसेविका

# आमचे गुणवंत

## शिवाजी विद्यापीठ परीक्षेमध्ये आमच्या महाविद्यालयात वर्गात प्रथम आलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी


प्रविण पाटील बी.ए.-१


कु. सुरेखा अ. पाटील बी.ए.-२


समीर या. पाटील बी.ए.-३


कु. पूनम भि. गोते बी.एस्सी.-१


कु. मिनाज इ. आत्तार बी.एस्सी.-२


कु. पल्लवी य. पाटील बी.एस्सी.-३

## हिंदी स्कॉलरशीप


कु. शितल शं. पाटील बी.ए.-२


कु. शोभा पां. रक्ताडे-पाटील बी.ए.-२


रोहन रा. डोणे बी.ए.-२

## हार्दिक अभिनंदन


प्रा. एस. ए. साळोखे
इंग्रजी विषयात एम. फील. पदवी


प्रा. डॉ. संजय पाटील
''महादेव मोरे यांचे साहित्य'' हा ग्रंथ प्रकाशित


प्रा. नेताजी पाटील
स्वामी विवेकानंद गौरव पुरस्कार


प्रा. एस. बी. देसाई
विद्यापीठ अनुदान आयोगाचे संशोधन अनुदान
हिंदी विभाग


प्रा. एस. एन. कुलकर्णी
विद्यापीठ अनुदान आयोगाचे संशोधन अनुदान
को. जि. प्रा. पत संस्थेवर संचालक म्हणून निवड


प्रा. आर. बी. चोपडे
विद्यापीठ अनुदान आयोगाचे संशोधन अनुदान
रसायन शास्त्र विभाग

# भावपूर्ण श्रध्दांजली

*अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती...*



## कै. कु. दिग्विजय विश्वास मुडुकशिवाले-पाटील

# संपादकीय....

'स्पंदन'चा हा सोळावा वार्षिक अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. तरीही एका गोष्टीचा उल्लेख करावाच लागेल.

२६.११.२००८ च्या मुंबईवरील अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्याने भारतच नव्हे तर सारे जग हादरले. माणुसकीला काळिमा फासणारी ही घटना आहे. भारताने साऱ्या जगाला अहिंसा, प्रेम बंधू-भावाची शिकवण दिली. ज्ञानेश्वरांचे विश्वशांतीचे पसायदान, तुकोबांचे वैश्विक तत्वज्ञान यापासून ते केशवसूतांच्या 'नवा शिपाई' पर्यंतच्या सर्व साहित्याने विश्वव्यापकत्व शिकविले. तरीही आमच्यावर असे अधून-मधून हल्ले होतात. या सर्वांचा परिणाम भारतीयांच्यावर, विशेषत: तरुणांवर होतो. ही पिढी मग अंतर्मुख होते आणि आपल्या लेखनातून व्यक्त होते. महाविद्यालयीन तरुण फक्त प्रेम कविताच लिहितात असे म्हणणाऱ्यांना ही पिढी मग दहशतवादी कृत्यांवर साहित्य लिहून उत्तर देते. याबरोबरच बेकारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अतिरेक्यांच्या कारवाया, देशप्रेम, वीर जवानांच्या कहाण्या, निसर्गाची विविध रुपे आमच्या तरुणांच्या लेखनातून शद्बबद्ध होतात.

आमच्या महाविद्यालयाची स्थापना सन १९९० ची. १८ वर्षे झाली या गोष्टीला. छोट्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले. कला, शास्त्र, संगणक शाखेला आज मोठ्या संख्येने विद्यार्थी आहेत. ही वाढ संख्यात्मक तसेच गुणात्मकही आहे. याबरोबर महाविद्यालयाची देखणी इमारत, प्रशस्त क्रीडांगण, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सांस्कृतिक, इतर कार्यक्रमांसाठी वेगळे, हवेशीर आणि प्रशस्त सभागृह, विद्यार्थिनींसाठी वसतीगृह या आमच्या जमेच्या बाजू. ही सर्व प्रगती होत आहे ती आमच्या मातृ संस्थेमुळेच. कारखान्याचे अध्यक्ष मा. आमदार के. पी. पाटीलसो, उपाध्यक्ष मा. केशवराव पाटील, सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, सचिव यांच्या प्रोत्साहनानेच आम्ही ही प्रगती करू शकलो. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर हे सतत कार्यप्रवण असतात. त्यांचे योगदान कौतुकास्पद आहे.

'स्पंदन'च्या निर्मितीसाठी संस्थेचे प्रोत्साहन, मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन, संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक मित्र, प्रशासकीय सहकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनींचे आणि श्रीपाद ऑफसेटचे मालक श्री. आर. डी. पाटील-देवाळेकर, व त्यांचे सहकारी यांचे सहकार्य लाभले. या सर्वांचा मी आभारी आहे.

धन्यवाद!

**आपला,**
**प्रा. डॉ. संजय पाटील**
**संपादक**

# मा. प्राचार्यसो यांचे मनोगत

दूधसाखर महाविद्यालय बिद्री हे दुर्गम, ग्रामीण भागातील प्रगतशील महाविद्यालय असून भागातील शेतकऱ्यांच्या मुलांमुलींची शैक्षणिक गरज भागवण्याशी बांधील आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून २००६ - २००७ सालापासून महाविद्यालयास अनुदान मिळण्यास सुरुवात झाली आहे. तद्नंतर महाविद्यालयाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाकडे जवळजवळ ११ ते १२ लाखाची ग्रंथ संपदा उपलब्ध झाली आहे, त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानानुसार लागणाऱ्या विषयाचे ज्ञान विद्यार्थी व शिक्षकांना सहजा सहजी मिळत आहे. त्याच बरोबर विज्ञान विभागाकडील प्रयोगशाळा अधिक सुसज्ज आहेत. त्या करीता १४ ते १५ लाखाचे अनुदान मिळाले आहे.

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही मागे पडू नये या दृष्टीने महाविद्यालयाकडे सन २००७-२००८ पासून कॉम्प्युटर सायन्स या विषयातील बी. एस्सी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. तो पुढील शैक्षणिक वर्षांपासून पदवीपर्यंत पूर्ण होणार आहे. त्याच बरोबर व्यावसाईक अभ्यासक्रम उपलब्ध करण्याच्या दृष्टीने बी. सी. एस. ही स्वतंत्र विद्या शाखा महाराष्ट्र शासन पुरस्कृत व शिवाजी विद्यापीठ सलग्न अशी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे बी. सी. एस. ही पदवी मिळविण्याची सोय भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना उपलब्ध झाली आहे. ज्या विद्यार्थ्यांना खर्चीक असे व्यवसायीक इंजिनिअरींग चे शिक्षण घेता नाही, अशा विद्यार्थ्यांना अल्पशा खर्चामध्ये ही पदवी मिळविण्याची सोय झाली आहे. त्यासाठी लागणारी सुसज्ज अशी २० संगणकाची प्रयोगशाळा ब्रॉडबॅंड इंटरनेट सेवेसह व तज्ञ शिक्षकांसह चालू आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणानुसार पदवीचे शिक्षण घेत असताना व्यावसाईक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. त्यानुसार मेडिकल लॅब टेक्निशियन या सर्टिफिकेट कोर्सची सोय महाविद्यालयामध्ये उपलब्ध केली आहे. हा कोर्स पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवामध्ये पॅथॉलॉजिक लॅबमध्ये सेवा करणेची संधी उपलब्ध होते.

खाजगीकरण, जागतिकीकरण, उदात्तीकरणाच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचा अनन्य साधारण उपयोग होतो आहे. या स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये चमकण्यासाठी आवश्यक स्पोकन इंग्लीश हा कोर्स महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहे. या कोर्ससाठी आवश्यक भाषा तंत्रज्ञान शिकणेसाठी (लॅंग्वेज लॅब) सुसज्ज अशी प्रयोगशाळा उभी राहते आहे. या कोर्सची गरज विद्यार्थी-विद्यार्थिनीशिवाय भागातील प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांनाही उपयोगी पडणारी आहे. जेणेकरून इंग्रजी बोलण्यासाठी शास्त्रोक्त असे ज्ञान मिळू शकते. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात विद्या वाणिज्य व शास्त्र शाखेकडील विद्यार्थ्यांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत त्या करिता लागणारा इन्फोसिस संस्थेमार्फत प्रशिक्षीत प्राध्यापक वर्ग महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे.

या सर्व सोई महाविद्यालयाने अगदी अलिकडे उपलब्ध केल्या आहेत आणि यासाठी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, पदाधिकारी, प्राध्यापक यांचे सहकार्य खूप मोलाचे ठरते आहे.

**डॉ. आर. एल. राजगोळकर**
प्राचार्य



आम्हा घरी (सकळ) धन शद्बांचीच रत्ने।
शद्बांचीच शास्त्रे यत्न करूं ।।१।।
शद्बचि आमुच्या जीवाचें जीवन ।
शद्बें वाटू धन जनलोकां ।।२।।
तुका म्हणे पहा शद्बचि हा देव।
शद्बेचि गौरव पूजा करूं ।।३।।

\- संत तुकाराम

# मराठी विभाग

विभागीय संपादक
प्रा. डॉ. संजय पाटील

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | फुलं आणि फुलपांखरू | नीता पाटील | ३ |
| २) | पहिलं प्रेम | रेखाताई कुंभार | ४ |
| ३) | कहाणी एका प्रेमवीराची | गणेश पाटोळे | ६ |
| ४) | आई-वडिलांना विसरू नका | विद्या माने | ८ |
| ५) | विवेक हवाच | स्मिता जिरगे | ९ |
| ६) | राजकारणात तरुणांच्या दिशा आणि दशा | रवींद्र पाटील | ११ |
| ७) | शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी | प्रवीण गुरव | १२ |
| ८) | महासत्ता | शरदचंद्र पाटील | १३ |
| ९) | व्यर्थ न हो बलिदान | कृष्णात पाटील | १५ |
| १०) | मैत्री | मेघा संकपाळ | १६ |
| ११) | चार दिवसाची भेट | सुरेश मस्कर | १६ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रेम म्हणजे | श्रीधर पाटील | १७ |
| २) | माफीचा साक्षीदार | सारिका सावंत | १७ |
| ३) | बात मैत्रीची | गोरख पाटील | १७ |
| ४) | प्रेम | सुयोग साळोखे | १७ |
| ५) | दहशतवाद एक आव्हान | राजश्री पाटील | १८ |
| ६) | तू आणि मी | शितल चौगले | १८ |
| ७) | परत कर | प्रकाश पाटील | १८ |
| ८) | नशीब | आश्विनी शेणवी | १८ |
| ९) | कोणीतरी... कुठेतरी...! | सुषमा पाटील | १९ |
| १०) | मायबापाची कहाणी | महेश पाटील | २० |
| ११) | मैत्री | प्रविण ढोके | २० |
| १२) | संदेश | पुनम मोरे | २१ |
| १३) | आई | सीमा संकपाळ | २१ |
| १४) | लगीन घाई | आश्विनी कावणेकर | २२ |
| १५) | जीवन | सविता पाटील | २३ |
| १६) | आपलं कोल्हापूर | दयानंद पाटील | २३ |
| १९) | इच्छा! | माधुरी वागवेकर | २४ |
| १७) | कॉलेजला येतेस.. | निलेश भिऊंगडे | २४ |
| १८) | प्रेम | रणजित खोत | २४ |
| १९) | भिमा तुझ्या जन्मामुळे | विजय कांबळे | २५ |
| २०) | मैत्रिण | तानाजी परीट | २५ |
| २१) | जाता जाता | विशाल पाटील | २६ |
| २२) | नवयुवक | कोमल परीट | २६ |
| २३) | प्रेम | शितल पाटील | २७ |
| २४) | नातं | रुपाली पाटील | २७ |
| २५) | माझे महाविद्यालय | सुभाष पाटील | २८ |
| २६) | जीवन | अश्विनी पाटील | २८ |
| २७) | जीवन हे असेच असते | संदीप चौगले | २९ |
| २८) | राजा शिवाजी | सुनील तोरस्कर | २९ |
| २९) | जीवाचा जीवलग हवाच | अभिजित चरापले | ३० |
| ३०) | तर आज मी जिवंत असते | दत्ता पाटील | ३० |
| ३१) | हे खरं ना! | अमोल पाटील | ३१ |
| ३२) | प्रेम | अमर कांबळे | ३१ |
| ३३) | माझ्या यशाच्या शिखरावरती | स्मिता व्हरवडेकर | ३२ |
| ३४) | 'ती' आणि एकांत | अश्विनी पाटील | ३२ |
| ३५) | मैत्री | स्वप्नाली मांडवकर | ३३ |
| ३६) | आई | शिल्पा चौगले | ३३ |
| ३७) | जरा जपून | सचिन चौगले | ३४ |
| ३८) | क्षण हे अखेरचे | सागर मोरे | ३४ |
| ३९) | माझी कविता आणि ती | प्रविण चौगले | ३५ |
| ४०) | आठवण | स्मिता पाटील | ३५ |
| ४१) | दहशतवाद | सुनीता तावडे | ३६ |
| ४२) | मैत्री कशी असावी? | शोभा रक्ताडे | ३६ |
| ४३) | हसत रहा तु सदा | गणेश जाधव | ३७ |
| ४४) | मन | पूजा पाटील | ३७ |
| ४५) | साथ तुझी | अर्जुन खोत | ३८ |
| ४६) | पुन्हा एकदा | जयश्री पाटील | ३८ |


## इतर


| | | | |
|---|---|---|---|
| १) | शिक्षण या शब्दाचा अर्थ | माधुरी भाले | ३९ |

# गद्य विभाग

## फुल आणि फुलपांखरू

नीता तुकाराम पाटील
बी. ए. भाग दोन

'निसर्ग आपला रंग
मुक्तपणे उधळत असतो
उमलणाऱ्या प्रत्येक कळीबरोबर
मला जगण्याचा अर्थ कळत जातो.''

सृष्टीला लाभलेल्या नयनरम्य निसर्गातील 'फूल आणि फूलपांखरू' हे दोन मौल्यवान घटक आहेत. ईश्वराने या सृष्टीवर असे काही मौल्यवान सजीव निर्माण केले आहेत की, ते मनुष्याच्या दृष्टीने जरी क्षुल्लक असले तरी त्यांना प्राप्त झालेला रंग, रुप, सौंदर्य अप्रतिम आहे. खरं तर 'सौंदर्य पाहणाऱ्याच्या डोळ्यात असतं.' आपण पाहतो आपल्या सभोवताली असणारी फुलं आणि फूलपाखरं आपलं मन मोहून घेतात. ईश्वराने मनुष्याला भरपूर काही दिलंय, पण मनुष्य त्याचा योग्य वापर करत नाही.

आज विविध फुले पहायला मिळतात. गुलाब, मोगरा, जास्वंद, डेलीया इ. या फुलांमध्ये आज विज्ञानाच्या प्रगतीमुळे विविध प्रजाती पहायला मिळतात आणि फुलं तर अगदी उमलल्यापासून कोमेजेपर्यंत सात कलरमध्ये बदलतात. फुलाचं जीवन जरी क्षणभंगूर असलं तरी ते त्याला लाभलेल्या जीवनाचं सार्थक करतं. फुल जेव्हा झाडापासून वेगळं केलं जातं तेव्हापासून ते सात-आठ तास टिकतं मग कोमेजून जातं. आणि जर ते झाडालाच राहिलं तर ते दोन-तीन दिवस राहतं. महत्त्वाचं म्हणजे ते टवटवीत राहतं.

फूल बरच फायदा देणारं पिक म्हणून केलं जातं. फुलं मोठमोठ्या कार्यक्रमात, समारंभाच्या ठिकाणी सजावटीसाठी वापरली जातात. तसेच विविध सौंदर्य प्रसाधने बनविण्यासाठी वापरली जातात. आणि सगळ्यात जास्त वापर म्हणजे स्त्रीया केसात माळण्यासाठी करतात. या फुलांना लाभलेलं आयुष्य काही तासांचं असतं. पण आपण आपल्या सुखासाठी त्यांना लाभलेलं क्षणिक आयुष्यदेखील हिरावून घेतो. तरीही कधी ते तक्रार न करता आनंदानं दुसऱ्यांना सुख देण्यास तयार होतं. आणि आपल्या अल्पशा जीवनाचं सार्थक करतं. यामधून ते दुसऱ्यासाठी जगण्याचा संदेश देते. पण, मनुष्य हा स्वार्थी प्राणी आहे. तो कधीच कोणाचा विचार करत नाही. तो नेहमी मृगजळामागे धावत राहतो. फुलांप्रमाणेच आणखी एक जीव आपले आयुष्य आनंदात जगतो. ओळखलत का?

''फुलपाखरु
छान किती दिसते
फुलपाखरू
या वेलीवर फुलाफुलातून
गोड किती हसते.
फुलपाखरु.''

हे चिमुकले बोल तुम्ही कितीदा तरी वाचले किंवा ऐकले असतील. खूप गोड वाटतात ना! यांचेही जीवन अल्पकाळ असते. पण बघा किती आनंदात बागडत असतात. पावसाळा सुरू झाला की, रिमझिमणारा पाऊस, हिरवा शालू पांघरलेली धरती, झाडांना लागलेली रंगीबेरंगी फुलं, दूर आकाशात अर्धवर्तुळाकार असणारे सप्तरंगी इंद्रधनु आणि बागडणारे फुलपाखरू किती छान वाटते ना हे दृश्य. ही फुलपाखरं जेव्हा जवळ येतात तेव्हा पकडण्याचा मोह आवरत नाही.

''पकडलेले फुलपांखरू बोटावर
रंग ठेवून उडून जात.
जगण्यासाठी सत्वाची
थोडी आहुती देवून जातं.''

आपल्या पंखाचा रंग गेला म्हणून ते निराश होत नाही. पुन्हा उडतं आणि जगण्याची उमेद निर्माण करतं. मला इतकच सांगायच आहे की, मनुष्य नेहमी स्वार्थीपणाने वागतो. तो कधी दुसऱ्यांचा विचार करत नाही. आपण झाडाचं फूल आपल्यासाठी तोडतो पण त्या फुलाचा किंवा झाडाचा कधी विचार करतो? किती वेदना होत असतील त्यांना! आपण नेहमी आपलाच स्वार्थ साधत असतो, आणि कशाच्या तरी मोहात धावत राहतो. यामध्ये आपण जगण्याचा खरा अर्थच विसरून जातो. जेव्हा जीवनाचा अर्थ कळू लागतो तेव्हा आपल्या

जीवनाचा अंत होतो. म्हणूनच आपण जीवन जगताना 'फुल आणि फुलपाखरां' प्रमाणे जगायचं. जीवनातील आनंद लुटायचा थोडा का असेना दुसऱ्यासाठी जगायचं. मिळालेल्या सुखात समाधान मानायचं.

म्हणजेच आपणाला डौलदार घर नाही मिळालं म्हणून निराश नाही व्हायचं. झोपडपट्टीत राहण्यापेक्षा बरं. म्हणजे मला असंही म्हणायचं नाही की, तुम्ही आहात त्याच ठिकाणी राहा. जरूर प्रगती करा. पण आपल्यामुळे दुसऱ्यांना त्रास देऊ नका आणि झोपडपट्टीतून बंगल्यात गेल्यावर आपली पूर्वीची परिस्थिती विसरू नका. अन्यथा तुमची स्थिती त्या फुलांसारखी होईल, जी ताजी असताना देवाच्या चरणावर व कोमजल्यावर ? कचरापेटीत टाकतात. म्हणू जगताना दुसऱ्यांनाही जगवा, समाधानाने जगा. द्वे मोह, गर्व या तीन अवगुणांना दूर ठेवा.

"फुल आणि फुलपाखरां
सारखं जीवन जगावं
स्वतः जगताना
दुसऱ्यालाही जगवावं
आलेलं संकटसुद्धा
आनंदानं झेलावं
मिळालेल्या सुखात
समाधान मानावं."

# पहिलं प्रेम

**रेखाताई दत्तात्रय कुंभार**
बी. ए. भाग तीन

**प्रीती**, इश्क, मोहब्बत, प्यार अर्थात प्रेम म्हणजे प्रेरणा, मनाच्या प्रेरणेतून साहित्याच्या पटलावरती शब्दरुपी सोंगट्या मांडतो तेव्हा तयार पाने त्याला प्रेमपत्र म्हणतात. माझं तुझ्यावर प्रेम आहे हे मला तुला सांगावयास नको, लिहावयास नको, मात्र माझ्या मनातील भावना तुजला कळणे महत्त्वाचे आहे यास्तव माझ्या आयुष्यातील पहिलंच प्रेमपत्र तुझ्यासाठी.

माझे प्रेम स्फटिकाहून पांढरे व गंगेच्या पाण्याहूनही निर्मळ आहे. प्रेमाची पणती तेवत ठेवण्यासाठी पत्ररुपी तेलाची गरज असते. माझ्या परिने ती मी पूर्ण करीत आहे. प्रेमाच्या या ज्योतीला जपायचे कि विझवायचे हे सर्वस्वी तुझ्या हातात आहे. मनाच्या भोवऱ्यात अडकलेल्या हातांना मोकळं करून माझ्या साथीच्या हातात हात दे, जादू भरलेल्या नशिली नजरेने माझ्या हृदयावर होणारा आघात राणी मला सोसवत नाही.

सोडतेस जेव्हा तुझ्या नजरेचा बाण
होतो घायाळ राणी माझा प्राण।

जेव्हापासून हे सुंदर नयन पाहिले तेव्हापासून माझे मन प्रफुल्लीत होऊन भान हरवून बसले. तुझ्याच नामी होऊन तल्लीन करीन म्हणते तुझ्याशीच लगीन. त्यास घालू मी कसा आवर कठीण गोष्ट मोठी हृदयावर. मी माझे सर्वस्व तुला अर्पण केले आहे. इथून पुढे जमू दे किंवा न देणे सर्वस्वी तुझ्याच हातात आहे.

मनातील प्रेमाच्या भावना स्नेहसंबंधाचे कडे तोडू अश्रुंचे रुप घेऊन नयन तीरावरून वाहून जाताना कंठ दाटू येऊन हृदयाचे ठोके वाढत आहेत. ह्या वेदना मला असह होत आहेत. त्या तुजला भोगावयास लागू नयेत. म्हणून य दिव्य प्रेमाचा स्वीकार कर व जीवनाला कमल फुलाप्रमाण भुलवण्यास साथ दे, या आसवांना वाहू देऊ नकोस आयुष्य प्रथमच इतके सुंदर बनून माझ्यासमोर आले असताना त्यास लपवू नकोस. ही सुंदरा जणू वाटे अप्सरा माझ्या मनामध्ये भरली रे, कोमल हिच्या जादूने मंत्रमुग्ध म झालो रे।

शुक्ल पक्षातील चंद्राच्या कोरीसारखी भासणार आकाशातील नंदा पाहून कळीप्रमाणे पिवळीधमक नाजूक व अलवार सुगंधी ती तूच आहेस. माझ्या मनाच्या दर्पणामध्ये केवळ तुझीच प्रतीमा आहे. फुलांच्याशिवा वेलीला शोभा नाही. वृक्ष म्हणजे उद्यानाची खरी शान फुलापानांची लयलूट करणारा वसंत तिथे आलाच नाही, त त्याला उद्यान म्हणू नये त्याचप्रमाणे तुझ्याविना माझ्या जगण्याला जीवनही म्हणू नये.

जिथे दूधाचा साठा नसेल तर त्याला क्षीरसागर क म्हाणावे, आपल्या किरणरुपी अमृताच्या करांनी जो जगाल

शितलतेचा अनुभव करून देतो त्या चंद्राचा जर आकाशात उदय झाला नाही तर ती रात्रही व्यर्थ आहे. यासम माझ्याशिवाय तुझ्या जगण्याला काय अर्थ आहे. माझ्या मनाच्या प्रतिबिंबामध्ये तुझे बिंब सदैव दिसते. ध्यानीमनी स्वप्नी मला फक्त तुझीच रुपे दिसतात. तुझ्या मुखातून आलेला प्रत्येक शब्द म्हणजे नाजूक फुलांच्या माळा व त्यांच्या दरवळणाऱ्या सुगंधाप्रमाणे असतो.

अगरबत्ती जळूनही आपल्या सुगंधाने सहवास निर्माण करते. त्याप्रमाणे जरी तू इथे नसलीस तरी तुझ्या अस्तित्वाचा भास मला आज होत आहे. सागरामधील जलाशयाची वाफ होऊन ती नभाच्या रुपाने धरतीवर उघडी होते. त्याप्रमाणे माझे हे प्रेम शब्दांच्या सरीसंगे तुझ्या कोमल हृदयामध्ये उतरवीत आहे. चातक पक्षी ज्या प्रमाणे फक्त पावसाच्या पाण्याची वाट पाहतो त्याप्रमाणे कोणाच्याही स्नेहबंधात न अडकता कोणतेही तुझ्यावर बंधन न घालता एका उदात्त हेतूने आपल्या भावी प्रीतीची प्रतिक्षा करीत आहे.

मौन तू मौनात तू तू मौनाची जाहली
बाह्य रुपात मी न गुंतलो।
तूच माझ्या मनाची सावली।

पृथ्वीवरील या जीवांच्या संघर्षातून आणि व्यथातूनही मला केवळ तुझे दर्शन घडते. पानावरती झगमगणाऱ्या दवबिंदूतून, बागेच्या पोटातून अंकुरणाऱ्या बिजांतून, फळाफळांतून, गगन मालेतून निसर्गाच्या प्रत्येक चराचरातून मला तुझ्या सहवासाचा भास होतो. तू माझ्या आयुष्यामध्ये वादळ निर्माण होऊन भाव भावनांच्या लाटा उसळू लागल्या. प्रेमाच्या दिव्य तेजाचा अनुभव तू मला दाखविलास पण आता त्याचाच भडकवून वणवा झालेला आहे. ह्या वणव्यामध्ये माझे सर्वांग जळत आहे. तुझे अमृतासारखे शब्द जेव्हा माझ्या कानी पडले तेव्हापासून माझ्या ओठावरती अधिरतेने तुझेच शब्द व आपण गायिलेली प्रेमगिते येतात. त्या शब्दानांही बंधन घालणे खूप कठीण जात आहे. माझ्या कल्पनेतला तो प्रेमाचा स्वर्ग कधी माझ्या वाट्याला येणार आहे. दिवसरात्र मनामध्ये फक्त हीच ओढ बाळगून जगत आहे. इतर प्रसंगी काळही वेगवान असतो. पण तू नसलीस जवळ तर तो क्षणही मला युगाप्रमाणे भासतो.

The first love letter towards accpeting love problem is to begain. पहिले प्रेमपत्र स्वीकारलेस तर पुढील प्रेम समस्या प्रयत्नाअंती सुटू शकतात याच विधानस्तव तुला सांगतो,

लाल मिरची त्यावरती हिरवा देठ,
तुजला देत आहे प्रेम पत्राची भेट।

हे सर्व काही तुझी जादू अथवा किमया आहे. तुझ्यापासूनच काही काव्यस्फूर्ती मिळाली व मी काव्यरचना करू लागलो. यामध्ये खोल विरहात जात जाणून घेतले की तुला हिंदी साहित्य खूप आवडते. म्हणून मी हिंदी साहित्य क्षेत्रात उडी मारली व माझ्या आयुष्यातील पहिली स्वरचित हिंदी शायरी लिहिली ती म्हणजे.

आता नही था हमको, हाथ में कलम पकडना सिखा,
दिया है तेरे प्यार ने आज हमको प्रेमपत्र लिखना।

तुझी ही रुपे माझ्या हृदयामध्ये काठोकाठ भरून ठेवलेली आहेत. पण जेव्हा हृदयातून विचारांच्या मार्गाद्वारे कल्पनेच्या प्रवेशद्वारातून हे शब्द कागदावर उतरतात तेव्हाच माठातून झरणाऱ्या पाण्यासारखे काही शब्दच माठातून अर्थात हृदयातून ओठांच्या पाऊलवाटावरून चालत चालत येताना जिभेला वळसा घालून बाहेर येतात व उरलेले आतच हृदयामध्ये राहतात. कारण मानव म्हणून माझ्यावरती कांही बंधने आहेत. मात्र अक्षरांची जी शक्ती हृदयात उरलेली आहे. तीच आज माझ्या जगण्याची प्रेरणा शक्ती, विश्वास ठरत आहे. मनातील प्रेमाच्या भावना अश्रुंच्या रुपाने ओसंडून वाहत असताना त्यांना शब्दबद्ध करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. विचारांच्या शक्तीला जाण देणारे खुराक यातून प्रीतीच्या बीजांना नकाराचे अंकूर फुटू न देता प्रयत्नांच्या झाडाला फळे लागावीत म्हणून प्रेम पत्ररुपी पाणी घालून मनाच्या मोकळ्या रानात धावणाऱ्या शब्दांनां अर्थाचा लगाम घालून रचनेने बांधियले व तुझ्याच स्मृतीत पहिले प्रेम शब्दात गुंफियले!"

प्रेमातील शेवटचे विनवणे नव्हे, शेवटी तुला एकच सांगणे.

"माझी हार मला मान्य आहे,
याचा अर्थ तू जिंकलीस,
असा होत नाही,
डाव कितीही तुझ्या हाती दिला
तरीही जिंकता तुला येत नाही."

तुझ्या हृदयातील धडकनींचा राजा. ■■

# कहाणी एका प्रेमवीराची

**गणेश सुनील पाटोळे**
बी. एससी. भाग तीन

गोष्ट तशी २००२-०३ सालातली. मी त्यावेळेला दहावीला होतो. महिना होता २००३ सालातल्या जानेवारीचा. दहावीला असल्याने अभ्यासाची जोरदार तयारी सुरू होती. सर्व विषयांचा व्यवस्थित अभ्यास सुरू होता. मग आला जानेवारीचा शेवटचा आठवडा. सर्व विषयांचा अभ्यास जवळजवळ आटोपला होता. परीक्षा होती मार्चमध्ये.

मी तसा आनंदी, सुखी, नेहमी हसतमुख. थोडासा नव्हे बराच पोरकट, खट्याळ. जीवन कसे आनंदी आणि व्यवस्थित चालले होते. पण मात्र तो दिवस आला. ज्याने माझ्या आयुष्याला कलाटणीच दिली.

दिवस होता २७ जानेवारी २००३ चा. ज्यावेळी मी तिला पाहिले. ती होती ८ वीला 'ब' तुकडीमध्ये. तसे मी तिला याआधी एकदोन वेळा बघितले होते. परंतु त्या दिवशीचा काय रंगच न्यारा होता. शाळा आमची तीन मजली. सर्वात खालच्या मजल्यात होते ऑफिस. मधल्या मजल्यात आमचा दहावीचा वर्ग आणि सगळ्यात शेवटच्या म्हणजे तिसऱ्या मजल्यात ८ वी 'ब'चा वर्ग म्हणजे तिचा वर्ग. दुपारचे ४ वाजले होते. खेळाचा तास होता. मी खेळायला गेलो नाही. मी वर्गातून बाहेर गेलो आणि तसाच सहज निवांत व्हावे म्हणून तिसऱ्या मजल्यावर गेलो. तिसऱ्या मजल्यावर चढण्यासाठीच्या पायऱ्यांवर उभा राहिलो आणि बाहेरच्या रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांकडे उगाच बघत राहिलो. अचानक माझी नजर तिच्या वर्गाच्या दिशेने गेली. त्यावेळी ती तिच्या मैत्रिणींबरोबर दरवाजाला टेकून माझ्या दिशेने बघत उभारली होती. तिला मी बघितले. पाहताक्षणीच अंगात वीज चमकावी तसे माझे शरीर थरथरले. मी तिला पाहत होतो. ती मला पाहत होती. मधूनच मैत्रिणींबरोबर बोलण्याचं नाटक करत माझ्याकडे हसत, प्रेमळ नजरेने पाहत उभी होती. तिला पाहताक्षणीच मला भूलोकिची अप्सरा माझ्यासमोर उभी असल्याचा भास होत होता. मला त्या दिवशी आकाश ठेंगणे झाले होते. दिवस सरत गेले. आम्ही एकमेकांना व्यक्त न केलेले प्रेम बहरत जात होतं. नजरेनजरेतून प्रेमाचे अविष्कार होत होते. पण एका दिवशी आम्ही सगळे मित्र दुपारच्या सुट्टीत घरी जेवायला चाललो होतो. ती आणि तिच्या मैत्रिणी घरी जेवायला चालल्या होत्या. त्या आमच्या पुढे होत्या. आम्ही त्यांच्या मागून चाललो होतो. मी त्यावेळेला पूर्ण जोशमध्ये होतो. मित्रांनी मला डिवचले आणि मला तिला माझ्या प्रेमाबद्दल प्रतिसाद विचारण्यास सांगितले. तसा मी प्रत्येक कामात घाईगडबड करणारा. परिणामांची पर्वा न करणारा. त्यावेळेला मला काय झालेले कोणास ठाऊक. पण मी त्या दिवशीच तिच्या पाठीमागे पळत गेलो. तिच्यापर्यंत पळत गेलो आणि अचानक बाजूला हटलो. हा प्रकार बघून ती खूपच घाबरली आणि संतापली. इथेच माझी सर्वात मोठी चूक झाली. इथेच माझ्या प्रेमामध्ये मीठाचा खडा पडला. मी काय करत होतो याचे माझे मलाच भान नव्हते. पुढे पुढे तर मी तिच्या मागून दररोज तिला हाका मारत फिरत होतो. पण यामध्ये कोणताही वाईट हेतू नव्हता. तिला माझ्या प्रेमाच्या प्रतिसादाबद्दल विचारण्यासाठी मी तिचे नाव घेऊन हाका मारत होतो. पण ती थांबत नव्हती. दिवस सरत होते आणि गैरसमज वाढत होते.

पुढे दहावीची परीक्षा दिली. परीक्षा चांगल्या मार्कांनी पास झालो. चांगल्या मार्कांनी पास झाल्यामुळे अर्थातच गावातल्या सायन्स कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतले. कॉलेजला जाताना वाटेतच शाळा लागत होती. बरोबर ती ज्यावेळेला शाळेची मधली सुट्टी होईल त्यावेळेला कॉलेजला जात होतो. पण मला पाहताच ती दूर जात असे किंवा परत आत वर्गात जाऊन बसे. त्यांची शाळा सुटायची ५ वाजता आणि माझे कॉलेज सुटायचे सव्वा चार वाजता. त्यामुळे घरी जाऊन मी आवरून

शाळेजवळ येत असे. शाळेजवळ एक खाजगी मंडळाचे वाचनालय होते. तिथेच मी तिची शाळा सुटायची वाट बघत असे. शाळा सुटली की तिच्या मागून जावून मी माझ्या घरी जात असे. पण आता तिच्या चेहऱ्यावर नेहमी मी आल्यावर राग स्पष्ट दिसत होता. पण मला त्याची पर्वा नव्हती. मी तिच्या प्रेमामध्ये आकंठ बुडालो होतो.

तो दिवस होता २२ डिसेंबर २००३. मी तिची वाट बघत वाचनालयामध्ये पेपर वाचत बसलो होतो. अचानक बाहेरून तीन माणसे आलीत आणि माझी कॉलर पकडून मला कानफाडीत मारायला लागलीत याचे कारण मला समजेना. अचानक माझी नजर त्या तीन माणसांच्या मागे गेली. पाहतो तो काय, ती होती. ती माझ्याकडे बोट करून त्या माणसांना सांगत होती, ''हा मुलगा दररोज माझ्या पाठिमागे हाका मारत फिरतो.'' हे बघून मला धक्काच बसला. मला तिच्याकडून अशी अपेक्षा नव्हती. माझ्याकडून काही त्रास होत होता तर तिने माझ्याशी तसे सरळ बोलायला हवे होते.

त्यानंतर मी पार कोलमडून गेलो होतो. तरीही ह्दयात प्रेमाची पणती मिनमिनत होती. या मनस्थितीतच माझी अकरावी बारावी पूर्ण झाली. बारावीची परीक्षा पूर्ण झाल्यानंतर मी MS-CIT चा कॉम्प्युटरचा कोर्स लावला होता. १८ जुलैला MS-CIT ची परीक्षा होती. ती देऊन आम्ही घरी येत होतो. पावसाचे दिवस होते. त्यामुळे हवेत एक प्रकारचा गारठा होता. पाऊस जोराचा पडत होता. तशा पावसात आम्ही घरी बिन छत्रीचे चाललो होतो. पाऊस जास्तच पडत होता. म्हणून एका दुकानासमोर उभारलो. आम्ही पाऊस थांबण्यासाठी वाट पाहू लागलो. तोच ती रस्त्यावरून घरी चालली होती. तिला पाहताच मला माझे जुने दिवस आठवले. तिचे हसणे, नखरे आठवू लागले. हे आठवूनच मनातल्या मनात सुखावून गेलो. मित्रालाही माझं प्रकरण माहीत होतं. मला राहवत नव्हतं. मित्राला म्हणालो, ''आज हिला प्रेमाबद्दल विचारावेच. कदाचित दोन वर्षात तिचा माझ्याबद्दलचा तिचा राग निवळला असेल.'' पण कसले काय मी परत तिला विचारायला गेलो तर तिने पुन्हा नकार घंटाच वाजवली. पण मला मात्र समाधान होते, की मी तिच्याशी बोललो.

पुढे असेच दिवस गेले. सिनियर कॉलेजला आलो. पाहिलं वर्ष चांगलं गेलं. दुसऱ्या वर्षात गेलो. बिद्री कॉलेजला येण्यापूर्वी मी नाशिकला B. Sc. I मध्ये शिकत होतो. पण तिथे काही माझे मन रमेना म्हणून मधूनच B. Sc. I सोडून गावी आलो. त्यामुळे त्या वर्षी गॅप पडला. पुढे बिद्री कॉलेजला आलो. पहिले वर्ष चांगले गेले. दुसऱ्या वर्षात गेलो. त्यावेळेला ती आमच्या कॉलेजमध्ये पहिल्या वर्षात शिकत होती. आम्ही सर्वजण एकाच गाडीतून कॉलेजला यायचो जायचो. त्यामुळे तिच्याकडे सहज अधूनमधून नजर जायची. त्यावेळी तीही मला चोरून बघताना पाहिले. त्यामुळे माझ्यातला सुप्त, झोपलेल्या प्रेमाच्या भावना जागृत झाल्या. असेच दिवस आनंदात जात होते. मला परत वाटले तिला विचारावे. पण धाडस होत नव्हते. अखेर वार्षिक खेळाच्या दिवशी म्हणजे ७ फेब्रुवारी २००८ रोजी तिला विचारले. नकार दिला. तरीही त्यामुळे माझे एक टिपूसभर प्रेम कमी झाले नाही.

पुढे दिवस गेले. तिचं ह्दय जिंकण्यासाठी मी गॅदरींगमध्ये भाग घेतला. तयारी जोरदार केली होती. गॅदरींगचा दिवस आला. पहिल्या दिवशी भाषणाचा आणि जेवणाचा कार्यक्रम झाला. दुसरा दिवस आला. तो होता महत्त्वाचा दिवस. कारण त्या दिवशी होते विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम. शेलापागोट्याचा कार्यक्रम झाला. आणि मधी थोडा पंधरा वीस मिनिटांची विश्रांती दिली. विश्रांतीनंतर कार्यक्रम सुरू झाला. पहिल्यांदा गाण्याचा कार्यक्रम होता. माझी वेळ आली. स्टेजवर मी पहिल्यांदाच आयुष्यात एकटा कार्यक्रम करत होतो. याच्याआधी लहानपणी मी एक दोन वेळा ग्रुप डान्समध्ये भाग घेतला होता. पण त्यावेळी मी सगळ्यात पाठीमागे कुणाला दिसू नये असा उभारलो होतो. असो. त्यानंतर मी हा नऊ दहा वर्षांनी कार्यक्रम करत होतो. आणि तोही एकटाच. मी स्टेज गीतात भाग घेतला होता. मी गाणं म्हटलं. गाणं होतं 'निले निले अंबर पे' गाणं अगदी झकास झालं. सगळ्यांना आवडलं. गाणं म्हणून मी खाली मुलांच्यात प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आलो. सगळ्यांनी माझं कौतुक केलं. आता मी मुलींच्या

घोळक्यात तिचा चेहरा शोधू लागलो. पण ती गेली होती. नेमकी शेलापागोटेचा कार्यक्रम बघून ती गेली आणि माझ्या सगळ्या मेहनतीवर पाणी फिरले. सगळे लोक कौतूक करत होते. पण त्या कौतुकांचा आणि स्वत:च्या नशिबाचा खूप राग येत होता.

वर्ष संपलं. शेवटच्या वर्षात आलो. आता मात्र ती समोरून आली की मान खाली घालून चालू लागलो. हृदयात प्रेमाची पणती मात्र पहिल्या प्रेमासारखी तेवत होती.

परत त्या वर्षीचे गॅदरींग आले. गॅदरींग दोन दिवस होते. पहिल्याच दिवशी ती गैरहजर होती. मला अंदाज आला ती दुसऱ्या दिवशी महत्त्वाच्या गाण्याला येणार नाही. पण मी स्टेज गीतात भाग घेतला. यावर्षी मी दोन गाणी म्हटली. 'कर्ज'मधले 'मेरी उमर के नौजवानो...' आणि 'कलाकार' मधले 'निले निले अंबर पे...' ती त्या कार्यक्रमालाही उपस्थित नव्हती. सगळे शिक्षक, मुले-मुली माझे कौतुक करत होते. यावेळी मात्र मी निराश झालो नाही. कारण माझे गाणे यावेळी मी सगळ्यांसाठी म्हटले होते आणि ते सर्वांना आवडले होते.

कथा इथेच संपत नाही. कारण ही माझ्या जीवनाची कहाणी आहे. ती चालतच राहणार.

जाता जाता एवढच माझं तिला सांगणं आहे की, ''मी तुझ्यावर खूप प्रेम केले होते, करत आहे आणि करत राहीन. माझा तुझ्यावर राग नाही. कारण मी केलेल्या चुकांची शिक्षा मला मिळत आहे. तू नेहमी खुश रहा. तुला जगातली सर्व सुखे मिळोत हीच त्या विधात्याकडे मागणी. मी त्यातला नाही ज्याला नकार दिला म्हणून त्या मुलीची बदनामी करायची. तुझे प्रेम माझी कमजोरी नाही तर मला आयुष्यात जगण्याची एकच हिंमत देईल. तू नक्कीच वाईट नाहीस. माझ्याबद्दल तुझ्या मनातील गैरसमज लवकरात लवकर काढून टाक. आता शेवटचं वर्षं संपलं की, मी तुझ्यापासून लांब जाईन. मात्र आयुष्यात परत भेटलीस तर या प्रेमवीरांची ओळख ठेव. तुला तुझ्या भावी आयुष्यासाठी लाख लाख शुभेच्छा!

■■

# आई-वडिलांना विसरू नका

**विद्या राजाराम माने**
बी. ए. भाग तीन

दुसरं कांही विसरा, परंतु आई-वडिलांना विसरू नका. त्यांचे उपकार अगणित आहेत. त्यांना विसरू नका. त्यांनी असह्य अशा वेदना सहन केल्या तेव्हाच आपण पृथ्वी पाहू शकलो. त्या पूज्यजनांचे हृदय तुम्ही दगड बनून ठेचू नका. आपल्या मुखातील घास देऊन त्यांनीच तुम्हाला मोठे केले. ज्यांनी अमृत पाजले, त्यांना विष पाजू नका, तुमचे ज्यांनी लाड केले, कौतुक केले त्या कोड कौतुक पुरविणाऱ्यांना, गरजा पूर्ण करणाऱ्यांना विसरू नका, ती मुलांपासून सेवेची इच्छा धरतात, तर मुलांप्रमाणेच सेवा करा.

''जसे कराल तसे भराल.''

ही भावना विसरू नका, जिने भिजलेल्या कपड्यावर स्वत: झोपून सुक्या कपड्यावर तुम्हाला निजविले, अशा तिच्या स्नेही डोळ्यात अश्रू येतील असे वागू नका. ज्यांनी तुमच्या मार्गावर प्रेमाची फुले पसरली, त्यांच्या मार्गातले काटे बनू नका. पैसे खर्चून सर्व कांही मिळेल, पण आई-वडिल मिळणार नाहीत. त्यांच्या पूज्य चरणांची आठवण ठेवा. त्यांना कधीच विसरू नका! तुम्ही मुलांना काय द्याल? तुम्ही तुमच्या मुलांना वारसा म्हणून काय देणार आहात? संपत्ती कितीही दिली तरी पुरी पडणार नाही.

परंतु सदाचाराचा, शीलाचा, चारित्र्याचा, निर्व्यसनीपणाचा, उद्योग क्षमतेचा व सद्गुणांचा वारसा आपण आपल्या मुलांना देऊ शकाल. ही गोष्ट श्रीमंत आणि गरीब या दोघांनाही शक्य आहे!!!

■■

# विवेक हवाच

स्मिता संजय जिरगे
बी. ए. भाग तीन

नरेंद्र, हे क्रांतीच्या महादेवता, कुठे आहेस तू? परतून ये. या तुझ्या भारतभूला आज विवेकानंदांची गरज आहे. आपल्या या विशाल संस्कृतीने पावित्र्याने व्यापलेल्या भारत पर्वाला, आम्हाला तुझी गरज आहे. कारण तुझ्यासारख्या प्रतिभावंत ना कधी होऊन गेला ना कधी होणार. आजच्या युवा पिढीला सुधारण्यासाठी तुझी गरज आहे. आणखी एक नरेंद्र व्हावा अशी इच्छा आहे. येशील का परतुनी तुझ्या भारतभूसाठी...

भारतातील हिऱ्याची पारख परदेशी करतात. पण आमच्या भारतीय लोकांना नाही. असाच तूही... तुझा जन्म १२ जानेवारीला झाला. १८५७ ते १९४७ पर्यंत तू देशाची सेवा केलीस. आजचा युवक ह्या तरुण वयात भरकटतो. पण तू तर भारत भूमीसाठी दिव्य बलिदान केलेस हे पाहून उर अभिमानाने भरून येतो. पण खंत इतकीच शिवाजी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे "गड आला पण सिंह गेला."

आजच्या ह्या देशात धडाडीचे नेतृत्व करणारा कुणीतरी हवा आहे. म्हणून तुला साद घालते. तुझ्या कथा शाळा, कॉलेजमध्ये वाचल्या, ऐकल्या आणि वाटलं तुझी ह्या भारतमातेला गरज आहे. तू जेव्हा लहान होतास तेव्हा तुला वडिलांनी विचारले, अरे नरेंद्र तुला कोण व्हायचंय? तू म्हणालास मला टांगेवाला व्हायचंय. बाबा तुझ्यावर ओरडले. मग आईने तुला विचारले. बाळ तुला काय व्हायचय? पुन्हा तू म्हणालास मला टांगेवाला व्हायचय. त्यावर आई म्हणाली, बाळ तुला टांगेवालाच का व्हायचय? त्यावर तू म्हणालास बघ तो टांगेवाला स्टेशनवरच्या उतारुंना त्यांच्या मुक्कामापर्यंत सोडतो. मलाही तेच करायचं आहे. आई आश्चर्यचकित झाली व एक पोस्टर आणून तुला म्हणाली, तुला टांगेवाला व्हायचय ना, मग असा हो. ते पोस्टर भगवान श्रीकृष्णाचे होते. त्यांनी अर्जुनासारख्या गोंधळलेल्या तरुणाला योग्य मार्ग दाखवला. किती मोठं स्वप्न होतं तुझं. अरे आजही अर्जुनासारख्या गोंधळलेल्या तरुणांना सावरण्यासाठी तुझ्यासारखा सारथी म्हणजे तूच टांगेवाला हवा आहेस.

तुझ्या वाणीने आणि कर्तृत्वाने एक गर्भश्रीमंत स्त्री प्रभावीत होऊन तुला म्हणाली की, माझ्याशी लग्न करा. कारण तिला तुझ्यासारखा सूर्याच्या तेजालाही भुलवणारा प्रतिभावंत मुलगा हवा होता, तेव्हा तू म्हणालास, तुम्हाला माझ्यासारखा दुसरा मुलगा कशाला हवा, मीच तुमचा मुलगा होतो. मोहावर फार मोठा विजय मिळवलास तू!

तू भगवं वस्त्र धारण केलंस कारण तुझ्याकडे पैसे नाहीत. हे भिकाऱ्यांना कळावं. ते नाराज होऊ नयेत म्हणून किती प्रेमळ असं हृदय तुझं! जेव्हा तू एकदा परदेशात भाषण करत होतास तेव्हा तुला एका मग्रुर गोऱ्याने हिंदुस्थानचा निषेध करायचा म्हणून बूट फेकून मारला. तू थोडावेळ थांबलास आणि म्हणालास, हे बूट ज्यांचे आहेत, त्यांनी घेऊन जावे. कारण एका बुटाचा मला काहीच फायदा नाही. अन्यथा दुसराही बूट मला फेकून मारावा. किती नम्र, विनयशील वर्तणूक!

तुझ्या अशा वीरगाथा ऐकून अभिमानाने हृदय फुलून येते रे! पण आज तुला साद घालते कारण या हिंदुस्थानचा पार चोथा झाला आहे. आणि याला कारण आम्ही हिंदुस्थानीच आहोत. इतक्या समस्या आहेत की, कुठून सुरुवात करू समजेनासे झालंय.

आज सर्वत्र नैतिक मूल्यांचा ऱ्हास, गगनाला भिडलेला भ्रष्टाचार, कधी नव्हता एवढा काळा बाजार, दिवसाढवळ्या तांडव! विज्ञान युगाच्या स्वागताप्रित्यर्थ

महागाईचे थैमान, महागाईचा राक्षस पुरता गिळतो आहे. अमीर मखमली बिछान्यात झोपतो. पण गरिबाला साधी चटईही नसावी. ही वस्तुस्थिती! तर जो बळीराजा सोनं पिकवतो, त्यालाच आज झोपडीत राहण्याची वेळ आली आहे. म्हणून आज शेतकऱ्यांची आत्महत्या हा मोठा गंभीर प्रश्न बनला आहे. पण ह्या महागाई, भ्रष्टाचार, लोकसंख्यवाढ, प्रदूषण, दारिद्र्य ह्या चक्रव्युहातून बाहेर न येणाऱ्या अभिमन्यूसारखी सामान्य माणसाची अवस्था झाली आहे. गुन्हेगारी, दहशतवाद हे राक्षस मात्र देशात थैमान माजवत आहेत. गल्ली ते दिल्लीपर्यंत हनुमानाच्या शेपटीप्रमाणे काळी कर्तृत्व वाढतच चालली आहेत. आणि ह्या सर्वांत मेलेल्या मढ्यावरचे लोणी खाणारे बोके मात्र मोकाट सुटले आहेत.

आजही देश जातीभेदात होरपळून निघतोय. आजही जातीभेदावर वादविवाद करून देश नासवला जातोय. जयंती व पुण्यतिथी दिवशी महान व्यक्तींची आठवण होते. पुतळा विटंबना हा तर एक प्रकारचा कार्यक्रमच होऊन बसलाय. आजची युवा पिढी पाश्चात्यांचे अंधानुकरण करून वाह्यात व वात्रटपणे वागते आहे. पाश्चात्यांचा पराकोटीचा अभिमान पण त्यांच्यात स्वावलंबीपणा दिसत नाही. कॉलेज सोडून कट्ट्यावर बसून पोरींच्या टिंगलटवाळ्या करणे हा मर्दपणा ठरू लागला आहे. ज्यावेळी कौरव द्रौपदीचं वस्त्रहरण करत होते. तेव्हा तिचा रक्षणकर्ता तिचा भाऊ श्रीकृष्ण कुठे आणि आज डिस्को, पबमध्ये नशेत झिंगणारी युवापिढी कुठे? तूच ठरव.

गुरुदक्षिणा म्हणून आपला अंगठा कापून देणारा एकलव्य कुठे! आणि आज कॉपी करायला दिली नाही म्हणून शिक्षकांवर हात उगारणारे महाभाग शिष्य कुठे. बाप दशरथांनी आज्ञा दिल्याने १४ वर्षे वनवासात जाणारा आज्ञाधारक राम, कावडीमधून आंधळ्या आईवडिलांना काशीला नेणारा श्रावणबाळ कुठे व आज भरून गेलेली वृद्धाश्रमे काय दर्शवितात? आजची युवापिढी भरकटत चालली आहे. ती दूरदर्शनवरील दिडदमडीच्या मालिका पाहून तसेच अश्लिल चित्रे पाहून नातीही ओळखेनाशी झालेत. म्हणून आज देशात संस्कारशिबिरं पैसे देऊन भरवली जातात. कारण आज आमच्या घरात टी. व्ही. सारख्या भौतिक सुखाच्या गोष्टींनी जागा व्यापली आहे पण आजी-आजोबासाठी घराचा एक कोपराही शिल्लक नाही. आणि आजी-आजोबांचं सोडाच हो! पण आई-वडिलांचा खून करणारे महाभाग जन्माला येत आहेत आजही देशात 'लेक वाचवा' अभियान राबवावं लागतं. बक्षिसे ठेवून स्वच्छता करवून घेतली जाते. हसावं की रडावं हाच मोठा प्रश्न आहे.

आजच्या तरुणांच्या संवेदनाही बोथट होत चालल्यात. आम्ही धावतो आहे फक्त करिअरमागे, बाकी कशाचीच खंत नाही. पण या 'मॉडर्न' जगात जिंदगीच हरवली आहे. व्यसनाच्या विळख्यात आजचा युवक झुलतो आहे. तर आजच्या तरुणींने चारित्र्य, नैतिक मूल्ये अगदी धाब्यावर बसविली आहेत. ज्या सिंहगडासाठी तानाजी मालुसरे म्हणाले, "आधी लग्न कोंडाण्याचे, मग माझ्या रायबाचे." आणि प्राणाची आहुती दिली. त्यावेळी शिवराय म्हणाले, "गड आला पण सिंह गेला." असे म्हणून लहान मुलाप्रमाणे ढसाढसा रडू लागले. त्याच पवित्र अशा सिंहगडाच्या पायथ्याशी 'रेव्ह' पार्टीसाठी युवापिढीच्या आयुष्याचा एकेक क्षण कमी होत आहे. व्यसनाधीनतेत तरुण झिंगून गेला आहे. ह्या तरुणांच्या जीवनरथाचं सारथ्य तुला करायचंय!

काय सांगू आणि काय नको असं झालंय. अजून भरपूर तुला सांगायचं आहे. फक्त तुला तुझ्या हिंदुस्थानची ओळख करून दिली. हिंदुस्थानचा तारू वादळात अडकलाय. सुरक्षित किनाऱ्यासाठी तुझ्यासारखा खलाशी आम्हाला हवा आहे. एकट्याने नाही काही होऊ शकत. आजच्या युवा पिढीचं हे चित्र

असलं तरी, जशा नाण्याला दोन बाजू असतात. एक चांगली व एक वाईट त्याप्रमाणेच काही चांगली माणसेही ह्या देशात अजून आहे. ज्यांना सिंहगर्जना व्हावीशी वाटते. करावीशी वाटते. हे सगळं बदलून विवेकानंदांचं जग बनवावसं वाटतं. त्यापैकीच मीही एक, म्हणून तर तुझी गरज वाटते. उणीव भासते. आज २१ व्या शतकात माणूस फार बदललाय. जेव्हा तो आकाशात भरारी मारतो. तेव्हा नेमके तो स्वत:चे घरटे विसरतो. आकाशात उंच उडताना घरटं कसं विसरून चालेल? विचार करूया विश्रांती कुठे घ्यायची? मी माझं ह्या स्वार्थीपणात जगण्यातला आनंदच आम्ही गमावलाय. पैसा, धन, दौलत आणि आनंद आहे, जमिनीवर पाय स्थिर ठेवून आकाशाला हात लावला पाहिजे. आकाशाच्या गगनभरारीच्या दिव्यात्वाला जमिनीचं भान सोडून कसं चालेल?

नरेंद्र आमची अवस्था पंख नसलेल्या पक्षासारखी झाली आहे. समोर उत्तुंग आकाश पसरलेय. ह्रदयात चांगल्या कल्पना आहेत. मनात स्वच्छ, निर्मळ विचारधारणा आहेत. इवल्याशा दोन डोळ्यात स्वप्न भरलेत. मला उडायचंय, मला घडायचंय, घडवायचंय असे हुंकार ह्रदयातून येत आहेत. पण छे! मला तर पंखच नाहीत. कोण देईल मला हे पंख? हा प्रश्न पडलाय. मात्र दुसरं मन म्हणतंय की, मिळतील तुला पंख हो, मिळतील तुला पंख, पण त्यासाठी ही योग्य वेळ नाही. आणि ही योग्य वेळ जरुर येईल. तोपर्यंत तू चालत रहा, चालत रहा.

नरेंद्रा, हे क्रांतीच्या महादेवता कुठे आहेस तू? परतून ये, परतून ये, या तुझ्या आणि आमच्या भारतभूला आज विवेकानंदांची गरज आहे. या विशाल संस्कृतीने, पावित्र्याने व्यापलेल्या भारत पर्वाला तू हवा आहेस. परतून ये. तुझ्या भारतभूला वाचवण्यासाठी परतून ये!

■■

# राजकारणात तरुणांच्या दिशा आणि दशा

रवींद्र आनंदा पाटील
बी. ए. भाग तीन

ज्यांचे स्नायू पोलादी आहेत. ज्याच्या मांसलपेशी लोखंडी आहेत, ज्याची छाती सिंहाची आहे आणि सागराचा तळ असो किंवा अवकाश असो, तो भेदून भेदून जाण्याची प्रबळ प्रबळ इच्छा ज्यांच्याजवळ आहे, असे शंभर तरुण मला द्या म्हणजे मी या देशात आवश्यक ती क्रांती करून कायाकल्प घडवून आणीन, असे मत स्वामी विवेकानंदांनी मांडले होते. त्यांनी तरुणांची शक्ती ओळखली होती. परंतु आत्ताची तरुण पिढी या आपल्या शक्तीचा वापर कशा प्रकारे करते यावरच देशाचे भविष्य अवलंबून आहे. आज तरुणांचा राजकारणातील वाढता कल चांगला असला तरी तो धोकादायकसुद्धा आहे.

जशा निवडणुका जवळ येतात तसे राजकीय नेत्यांना गावागावांमध्ये जाण्याची सवय आहे. तेथे जाऊन चिथावणीखोर केलेल्या भाषणामुळे तेथील वातावरण तंग होते. राजकीय नेते राजकारणामध्ये स्वत:ची पोळी भाजून घेण्यासाठी हे सर्व कांही करत असतात हे सामान्यांना कळणार कधी. त्यांच्या भाषणाने प्रभावीत झालेले विणाकारण भांडणे करतात, अशाच वादामध्ये आपल्याच कॉलेजचा दिगंबर विश्वास मुडूकशिवाले या निष्पाप युवकाचा बळी गेला. मरणारा मरुन गेला, ज्याने मारले तो शिक्षा भोगेल. मात्र त्या दोघांच्या कुटुंबियांचे काय? कर्तीसवर्ती मुले गमावल्याचे दु:ख त्यांनाचमाहीत.

अशा वादावादीमध्ये कागल तालुका अग्रेसर, असलेला दिसतो. यामध्ये बेलवळे, बोरवडे, बोळावी, सांगाव, मळगे, मुरगुड यासारखी गावे पुढे असतात. तेथे राजकारणातून बारा महिने वादावादी आपणास पहावयास मिळेल. यात तरुणाचे प्रमाण मोठे असतेच.

जवानी मस्तानी होती है।
ये बडी खतरनाक चीज होती है।

अकल होती है, होश भी होता है।
लेकिन जोश उससे जादा होता है।
इतना जादा की वो अकल को मार देता है।

कॉलेजचा तरुण हा करिअरच्या मुख्य वळणावर असताना तो राजकीय भोवऱ्यामध्ये सापडतो व नंतर तो त्यातून लगेच बाहेर पडत नाही. तरुणाईच्या जोशामध्ये भांडणे होतात मात्र ते निभावताना म्हातारपण आठवतं. त्यामुळे तरुणांनी ठरवलं पाहिजे की, राजकारणामध्ये आपण किती समरस झाले पाहिजे. माझे असे मत नाही की, तुम्ही राजकारणामध्ये भाग घेऊ नका, जेव्हा आपल्यावर अन्याय होत असतो. समस्या उभ्या राहतात. सोई-सुविधा मिळत नसतात तेव्हा त्या राजकर्त्यांकडून मिळवल्याच पाहिजेत. परंतु राजकारण म्हणजे इर्षा आणि मारामारी ही भावना तरुणांनी बदलली पाहिजे. राजकीय नेतेही समाजाच्या सेवेसाठी असतात समाज त्यांच्या सेवेसाठी नसतो.

समाजामध्ये राजकारणातून अनेक गुन्हे असतात. त्यातील जास्तीत जास्त गुन्हे राजकीय शक्तीतून दडपले जातात. अगदी ट्रॅफिक पोलिसांनी गाडी अडवली तरी साहेबांना फोन लावला जातो व तेथेच पोलिसाला थांबवले जाते. राजकर्त्यांच्या अशा वागणुकीमुळे सामाजिकरीत्या काही अपप्रवृत्तीना खतपाणी मिळते व यातूनच तरुण पिढी गुन्हेगारीकडे वळते. राजकर्त्यांच्या अमिषाला तरुणांनी बळी पडू नये. त्यामध्ये नुकसान समाजाचे व अप्रत्यक्ष आपल्या देशाचे आहे. ज्याच्यासाठी आपण रक्त सांडतो, ते आपल्या मुलाबाळांसोबत सुखासमाधानाने जगत असतात. मात्र सामान्य माणूस यामध्ये भरडला जातो. मारामारी झाल्यानंतर कोर्टात केसेस जातात व त्यानंतर सामान्य नागरिकांचे काय हाल होतात ते आपण सर्वांना माहीत आहे. म्हणूनच जुनी माणसे म्हणतात की कोर्टाची पायरी शहाण्याने चढू नये. मात्र आतातरुणांच्या मध्ये कोर्टामध्ये जाण्याची इर्षा लागली आहे. किरकोळ कारणावरून वाद करण्याची सवय लागली. आपल्या आईवडिलांची जन्मभराची दौलत व मान सन्मान धुळीत मिळाला तरी तरुणांना काही वाटत नाही.

आता आपणच ठरवले पाहिजे की, तरुणांनी आपल्यापाशी असलेली शक्ती कशी व कोठे वापरायची ही शक्ती दुधारी शस्त्राप्रमाणे आहे यामुळे देशाचा विकास देखील होऊ शकतो व विनाशदेखील होऊ शकतो. तरुणांनी वाईट दृष्टीकोनातून राजकारणाची दिशा धरली तर त्यांची काय दशा होईल हे वेगळ्या प्रकारे सांगावयास नको. ■■

---

# शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी

**प्रविण गुरव**
बी. एस्सी. भाग एक

"ओ माय गॉड! किती लेट झाला! मला इमिजिएटली गेलंच पाहिजे!" तीन वाक्यात तीन वेळा माझ्या मातृभाषेला भोसकणे मला मी सहज पचविले. 'भर रस्त्यात पोलीस चौकीजवळ भोसकून खून!" या पहिल्या पानावरील वर्तमानपत्रातील बातमीप्रमाणे माझी मैत्रीण गेली पण माझ्या मनात विचार उठले पाण्यात टाकलेल्या दगडाप्रमाणे!

फादर स्टिफन्स म्हणतात
जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी,
परिमलामाजी कस्तुरी,
तैसे भाषामाजी साजिरी मराठिया।।

पण आजकाल इंग्लिश बोलणे हे सुधारलेपणाचे, प्रतिष्ठेचे मानले गेले जाते. जोशी, देशपांडे, परांजपे यांचे कुलदीपक जेव्हा 'सिनीयर के. जी.' ते गेल्याचं त्यांचे डॅडी कौतुकानेसांगतात तेव्हा हे फॅड मला मॅड करतं. 'देअर इज टुलसी वृंदावना इन आवर कोर्टयार्ड...' हे वाक्य या मातीत जन्मणाऱ्या, वाढणाऱ्या अन् याच मातीत मिसळणाऱ्यांच्या तोंडी ऐकून माझी मराठीमाय वांझ तर झाली नाही ना? असे वाटते. खरंच का इंग्लिशच्या कुबड्या एवढ्या आवश्यक आहेत. खरंच का माझी मातृभाषा एवढी हिणकस आहे?

२२ नोव्हेंबर १९०४ च्या 'केसरी'च्या अग्रलेखात लोकमान्य टिळक म्हणतात, 'आमच्या सुशिक्षीत बांधवांना आजकाल मराठीची लाज वाटते, हे केवळ ज्ञान मिळवण्यासाठी दुसऱ्या माध्यमांचा आपणच स्वीकार केला तर मराठी वाढणे दूर, टिकणेही अशक्य!" आणि

शतकानंतरही परिस्थिती तीच आहे.

आपल्या सुशिक्षीत लोकांपैकी एकही जपान, जर्मन वा फ्रेंच या माध्यमांचा वापर करावा असे म्हणत नाहीत. तंत्रज्ञानाच्या बाबतीत ते इंग्रजांच्या किती पुढे आहेत हे वेगळं सांगायलाच नको. अशावेळी वाटते की आपण इंग्रजांकडून देश तर सोडवला पण आपली भाषा अजूनही त्यांच्याकडे गहाण आहे. मातृभाषा ही सहज आकलन होणारी असते. बुद्धिविकासाला योग्य असते. बुद्धिचा विकास ६-८ वर्षापर्यंत जेवढा होतो तेवढा पुढे कधीच होत नाही, असे मानसशास्त्र म्हणते. या काळात मूल हे घर आणि परिसर यांतच वावरत असते. त्यावेळी आपल्या आसपासच्या परिसराची भाषा ते सहज आत्मसात करते. पुढे विविध भाषा शिकून ते विद्वान बनते.

८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अध्यक्ष अरुण साधू यांनी 'मराठीला ज्ञानभाषा करण्याची नितांत गरज आहे' असे विधान मांडले. आपल्या मातृभाषेचा विकास करून तिचा दर्जा उंचावून तिला ज्ञानभाषा करावे. चिपळूणकर इंग्लिशचा 'वाघिणीचे दूध' म्हणून उल्लेख करायचे. पण आईच्या दुधाची सर का वाघिणींच्या दुधाला येणार आहे? 'यशवंतराव चव्हाण' यांच्या मते लोकभाषा व ज्ञानभाषा वेगळ्या हव्यात. यशवंतरावांची ज्ञानभाषा म्हणजे चिपळूणकरांचे 'वाघिणीचं दूध' आपण आपल्या मातृभाषेचा विकास करून, तिचा दर्जा उंचावून तिला ज्ञानभाषा करणे, हे काम येथील बुद्धिमंतांचे आहे. पण ह. ना. आपट्यांसारखं 'पण लक्षात कोण घेतो?' म्हणावंसं वाटतं.

# महासत्ता

**शरदचंद्र शंकर पाटील**
बी. एस्सी. भाग दोन

"पृथ्वी"च्या यशस्वी चाचणीने शेजारच्या देशांना धक्का बसणे साहजिक होते. पाश्चात्य देशांनीही प्रथम आश्चर्याचा भर ओसरल्यावर राग व्यक्त केला. सात देशांच्या एकत्रित गटाने दबाव आणून लक्ष्यवेधी क्षेपणास्त्रांचा पुढील विकास रोखण्यासाठी प्रतिबंध आणला, कुणीही भारताला लक्ष्यवेधी क्षेपणास्त्रांशी, दुरान्वयाने संबंध असलेली साधने विकू नयेत अशी बंदी घातली. आपला देश क्षेपणास्त्रांच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे, हे अनेक विकसित देशांना अस्वस्थ करून गेले." डॉ. कलाम यांच्या या ओळीतून आपल्याला कळते की, जगाच्या नकाशात आपल्याला किती सामर्थ्यशाली, स्वयंपूर्ण आणि कार्यक्षम झाले पाहिजे. नाहीतर जागतिक राजकारणामध्ये आपले स्थान मजबूत होऊ शकणार नाही.

आपला भारत देश जगात सर्वात जास्त तरुण वर्ग असणारा देश आहे. आणि भारतीय तरुणांनी जर भारताला महासत्ता बनवायचे ठरवले, तर या जगातील कोणतीही शक्ती त्याला २०२० च्या आत महासत्ता बनवण्यापासून थांबवू शकत नाही. आवश्यकता आहे ती व्यापक दृष्टीकोणाची.

भारतदेश महासत्ता बनवण्यासाठी अनेक समस्या आहेत. बेरोजगारी, गरिबी, शिक्षण, लोकसंख्या अशा अनेक समस्या आहेत. परंतु सर्वात मोठी समस्या आतंकवाद आहे. भारतात ७ महिन्यांत ७० बॉंबस्फोट किंवा आतंकवादी हल्ले होतात. त्यावेळी त्या देशातील लोक सुखाने श्वास कसा घेतील? मुंबईवर २६ नोव्हेंबरला जो हमला झाला त्यावेळी कमांडोच्याकडे विमान नसल्याने त्यांना आकंतवादी हल्ला झाल्यापासून कारवाई करण्यासाठी साडे नऊ तास लागते. आमच्या देशांच्या संरक्षण मंत्र्यांनी केलेच काय? समजा असाच आतंकवादी हल्ला अमेरिकेच्या कोणत्याही भागात झाला असता तर कांही सेकंदातच त्यांची विमाने किंवा कमांडो त्या ठिकाणी पोहोचली असती. मग आमच्या देशांचे नेते करतात काय? ह्या नऊ तासांचे सेकंदात रुपांतर होणार कधी? आणि सगळ्यात दुःखाची गोष्ट म्हणजे देशांवर संकट असताना आमच्या देशातील नेते मंत्रिपदाचा

राजिनामा देतात. म्हणजे ह्या मंत्र्यांना लोकांच्या प्रश्नाची उत्तरे द्यायची नाही आहेत? जबाबदाऱ्या नको आहेत? मग ह्यांचा उपयोगच काय? आणि सगळ्यात लाजीरवाणी गोष्ट म्हणजे महाराष्ट्रावर एवढे मोठे संकट आले असताना आमच्या महाराष्ट्रातील नेते खुर्चीच्या पाठीमागे लागलेले आहेत. म्हणजे ह्या नेत्यांना सामान्य लोकांची चिंता नाही? ह्याना फक्त खुर्चीची चिंता आहे.

माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी कागलच्या भाषणामध्ये सांगितले होते. ''मंत्र्यांनी राजीनामे दिले म्हणून देशाचे प्रश्न संपणार नाहीत. मुंबईवरील हल्ल्याने नेतृत्व आणि प्रशासनाचे अपयश स्पष्ट झाले आहे. पदे, सत्ता आणि मतांसाठी सारे राजकारण सुरू आहे. राजकीय ढवळाढवळ थांबली. तर पोलीस एका महिन्यात अख्खी मुंबई साफ करून टाकतील.'' आपल्या देशातील पोलीस किंवा सैनिक देशात किंवा सिमेवर आपला जिव धोक्यात घालून लढत असतात. परंतु आमच्या सरकारकडे पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी किंवा शस्त्रास्त्रे घेण्यासाठी पैसेनाहीत. परंतु त्याच सरकारकडे नेत्यांना गाड्या देण्यासाठी पैसे आहेत. मुंबईवर आतंकवादी हल्ला झाला त्यावेळी आपल्या देशातील पोलीस आणि कमांडो आपल्या जीवाची पर्वा न करता ६० तास आतंकवादाच्या संगे लढतील. त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी आमच्या सरकारकडे पैसे कमी आहेत. परंतु ऑलिंपिक विजेत्या एखाद्या खेळाडूला आम्ही ५ कोटी देतो तर ह्या पोलिसांना किंवा कमांडोंना आपले सरकार का मदत करत नाही? काय आपल्या मनातील देशाविषयी, तिरंग्याविषयी स्वाभिमान संपला आहे काय?

मित्रांनो, वरील प्रश्न सोडवण्याची ताकद फक्त देशातील युवकांच्यामध्ये आहे. परंतु या सर्व प्रश्नावर मात करण्यासाठी आवश्यकता आहे, स्वत:वर विश्वास ठेवण्याची, धैर्याने समोरच्या समस्यांना तोंड देण्याची आणि आपल्या देशात असे पत्रकार तयार झाले पाहिजेत की जे लोकांच्यापर्यंत जास्तीत जास्त 'इन्साईड स्टोरी' सांगू शकतील किंवा सरकारी खात्यात असे लोक पाहिजेत की ज्याचे उद्दिष्ट लोकांचे जास्तीत.जास्त प्रश्न सोडवणे हेच असले पाहिजे.

प्रत्येक भारतीय युवकाने एक स्वप्न पाहिले पाहिजे आणि ते स्वप्न सत्यात उतरण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आणि त्याचे अंतिम उद्दिष्ट आपल्या भारत देशाच्या विकासाचं असलं पाहिजे.

तेव्हा मित्रांनो, विकसनशील असलेला आपला भारत देश महासत्ता बनणार हा विचार समोर एक ध्येय ठेवून जातो. आणि ध्येयाविषयी महर्षी पतंजली म्हणतात, ''तुम्ही जेव्हा एखाद्या असीम ध्येयाने प्रेरीत होतात किंवा एखाद्या सर्वांपेक्षा वेगळी आणि विराट कामगिरी हाती घेता तेव्हा तुमच्या विचारांची शक्ती त्याच्या मर्यादा ओलांडून पुढे जाते. तुमचं मन सर्व बंधनं झुगारून देतं. तुमच्या जाणिवा सर्व दिशांनी प्रगल्भ होतात आणि तुम्ही एका सुंदर, शूचिर्भूत आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या विश्वात प्रवेश करतात. सुप्त आणि दबून राहिलेले चातुर्य, बुद्धिमत्ता, सृजनशीलता उफाळून वर येते आणि सर्व नियंत्रण आपल्या सोनेरी हातांमध्ये घेते. तेव्हा आपल्या लक्षात येते की आपण आपल्याला समजत होतो त्यापेक्षा खूप काही वेगळे आहोत.'' ■■



# व्यर्थ न हो बलिदान !

कृष्णात दिनकरपाटील
बी. ए. भाग तीन

२७ नोव्हेंबर २००८ च्या सकाळी वृत्तपत्र बघितले आणि ठळक अक्षरातील 'हेडलाईन' वाचून क्षणभर काहीच सुचेना. ती बातमी होती मुंबईवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात पोलिस दलातील तीन मोती शहीद झाल्याची. केवळ दहा अतिरेक्यांनी मुंबईला साठ तास वेठीस धरले होते.शेवटी कमांडोंच्या सहकार्याने हा हल्ला थांबवला. ज्यांचे नाव घेताच गुन्हेगारी जगताचा थरकाप उडायचा ते आय. पी. एस. अशोक कामटे, ज्यांचा उल्लेख पोलिस खात्यातील संगणक म्हणून व्हायचा ते ए. टी. एस. प्रमुख हेमंत करकरे, ज्यांनी ७० हून अधिक कुख्यात गुन्हेगारांना यमसदनी पाठवले ते; इन्काउंटर स्पेशालिस्ट विजय साळसकर या शिलेदारांचे हौतात्म्य ही पोलिस दलाबरोबरच सर्वसामान्यांनाही न भरून येणारी जखम होती.

नुकताच आपण साठावा प्रजासत्ताक दिन साजरा केला. या पार्श्वभूमीवर २६ नोव्हेंबरच्या दहशतवादी हल्ल्याला दोन महिने पूर्ण झाले.या काळात राज्यमंत्रीमंडळा बरोबरच केंद्रीय मंत्रीमंडळातही फेरबदल झाला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीही बदलले पण मुळ जखमेवर अजून इलाज झालेलाच नाही. हल्ल्यापूर्वी दोन वर्षे हेमंत करकरेंनी पश्चिम किनारपट्टीच्या सुरक्षेसाठी प्रस्ताव तयार केला होता. परिणामी तेथूनच हे अतिरेकी आले. आणि त्यांनी केलेल्या हल्ल्यात करकरे शहीद झाले. हे झालं राज्यव्यवस्थेचं अपयश; पण सर्वसामान्य नागरीकांनीही यातून काय बोध घेतला. ही बाब सुद्धा अत्यंत महत्वाची आहे.

२६ नोव्हेंबरनंतरच्या प्रत्येक सार्वजनीक कार्यक्रमात शहीदांचे डिजीटल फलक लावून श्रद्धांजली वाहिली जात आहे पण एवढ्यावरच आपली जबाबदारी संपत नाही. ही पुनरावृत्ती होणार नाही ही खबरदारी घ्यायला हवी. याआधी अनेक दहशतवादी हल्ले झाले. ते सर्व आम्ही सहन केले. आता हा ही हल्ला मोठ्या हिमतीने सहन करू ही मानसिकता आता बदलायला हवी. दहशतवाद्यांना कुठलाही धर्म किंवा पंथ नसतो. हे आता सिद्ध झाले आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयाने एकात्मतेची भावना अधिक दृढ करणे गरजेचे आहे.

जगातील सर्वात जास्त तरूणांची संख्या असलेला आपला भारत. २०२० च्या महासत्तेचं स्वप्न उराशी घेऊन जगतोय, अशावेळी दहशतवादाच्या रोगाने असुरक्षित बनवनं हे आपलं सर्वस्वी अपयश आहे. शहीद झालेल्यांविषयी आपण वृत्तपत्रातून वाचलच आहे. त्यांच्या बलिदानाबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांचाही त्याग पाहून अंगावर शहारे येतात. साहजिकच या शहीदांच्या बलिदानाला जर व्यर्थ जाऊ द्यायचे नसेल तर या दहशतवादा विरूद्धच्या लढ्यात सर्वांनी सहभागी व्हायलाच हवं. यासाठी राज्यकर्त्यांचे डोळे उघडून त्यांना सुरक्षेसाठी ठोस पावलं उचलायला भाग पाडणं गरजेच आहे. अर्थातच हे सर्व आमच्यावरच अवलंबून आहे.

■■

## चारोळ्या

घायाळ करते चाल तुझ्या पापण्यांची,
कुठं शिकलीस कला ही काळीज कापण्याची!
डफावरती थाप, तुणतुण्याला ताण,
राष्ट्रीय सेवा योजना हाच आमचा प्राण.
गेली जशी अनेक वर्षे निघून
तसे हेही वर्ष निघून जाईल
जीवनातील शिकण्याचा एक
धडा संपून जाईल
अनेक आठवणीतही तुझीच
एक आठवण बनून जाईल.

**- प्रमोद श्रीपती पाटील**
बी. ए. भाग तीन

# मैत्री

मेघा मनोहर संकपाळ
बी. ए. भाग दोन

मनाच्या मंदिरामध्ये, भावनांच्या वेलीवर, पाण्याच्या सिंचनामध्ये असणारे मोहक फुल म्हणजे मैत्री होय.

मैत्रीत त्याग असतो मैत्री आणि स्नेहसंबंध जोडण्यासाठी त्याग, प्रमाणिकपणा आणि परीपक्वतेची आवश्यकता असते. त्याग हा काही जाता जाता होत नसतो. तर तो जाणीवपूर्वक करावा लागतो. स्वार्थीपणामुळे मैत्रीत बाधा येते. नुसत्या ओळखीपाळखी सहज होतात. परंतु खरी मैत्री जुळायला वेळ लागतो आणि ती टिकवायला प्रयत्न करावे लागतात. मैत्रीला सत्वपरीक्षा घ्यावी लागते आणि त्यातून जेव्हा ती टिकून राहते तेव्हा ती अधिक दृढ असली पाहिजे. आपल्या मित्राला त्रास व्हावा असं खऱ्या मित्राला कधीच वाटत नाही. खरी मैत्री ही घेण्यापेक्षा अधिक देते आणि प्रतिकूल परिस्थितीतही भक्कमपणे टिकून राहते.

अशी मैत्री एकमेकाबद्दलचा आदर आणि कौतुक यावर आधारलेली असते. खरे मित्र मनापासून एकमेकांचे कल्याण चिंततात आणि त्याप्रमाणे वागतात जीवनात आपण केलेल्या सत्कृत्यांची भरपाई म्हणजेच आपल्याला लाभलेले चांगले मित्र असंही म्हणता येईल. खरी मैत्री चारित्र्य आणि बांधिलकीवर आधारलेली असते.

तुम्ही आनंदात असाल तर लोक तुमच्या जवळ येतील तुमच्या सर्व सुखात ते भागीदार होतील. तुम्ही दिलेले गोड पेय आनंदाने पितील पण जेव्हा तुम्ही दुःखात असाल तर ते लोक पाठ फिरवतील त्यांना तुमचं दुःख नको असतं. परंतु आयुष्यातील कडवट प्रसंग तुम्हाला एकट्यालाच झेलावे लागतील.

न संपणारे अखंड स्मीत असावे
न बोलता ऐकू येतील असे शब्द असावे
उन्हाळ्यात पाऊस पाडतील असे ढग असावेत
न भागता साथ देतील असे मित्र असावेत

■■

# चार दिवसाची भेट

सुरेश मारुती मस्कर
बी. ए. भाग दोन

चार दिवसाची भेट... चार दिवसाचं नातं आणि बंधन तोडायला मन बावरतं.

जीवन हे नेहमी संत गतीने चालले आहे. आयुष्याच्या वळणावर अचानक कोणाची तरी चाहूल लागते. मनात पाहून खळबळ होते हळूहळू ओळख होते, मैत्री वाढते, मदतीची गरज असते, सतत पहावे किंवा काहीतरी बोलावेसे वाटते. एखाद्या दिवशी पाहिले नाही तर हुरहुर वाटते.

असच कोणीतरी हृदयाचा भाग बनून जातं. जास्त-जास्त सहवासात गुणदोष नजरेस येतात, कांही वेळेस गैरसमज होतात, तर कधीकधी अबोला राहतो.

इतकं झालं तरी मनातील प्रतीमा पूर्वीचीच राहते. जे कांही बरं-वाईट घडलं ते सर्व खोटं होतं असं मनाचं मनाशी समजावतं.

कधी-कधी वाटतं आपली नजर झाली नसती तर काय झालं असतं?.... आणि आपण एकमेकांपासून दूर गेलो तर काय होईल? या विचाराने डोळे पाणावतात. कालांतराने दूर जाण्याची वेळ येते. मन उदास होतं आणि बघता-बघता तो दिवस उजाडतो... दूर जाण्याची वेळ येते तेव्हा वाटतं खूप कांही द्यायचं राहून गेलं.

मग असच कोणीतरी जीवनातून निघून जातं. एक कधीही न भरून येणारी पोकळी... व मनात अनेक अनुत्तरी प्रश्न ठेवून जातं. तरी चार दिवसाची रंगत-संगत आयुष्यभराची गोड आठवण बनून राहते.

''जगावेगळी कशाला लावलीस तू माया?''

■■

# पद्य विभाग

## प्रेम म्हणजे

प्रेम म्हणजे काय असतं
हृदय जोडणारं नातं असतं
दगडालाही पाझर फुटणं असतं
प्रेम कधी भेद मानत नसतं
नाजूक धाग्यांनी जुळत असतं
प्रेम म्हणजे प्रेम असतं
दोन मनं गुंफत असतं
प्रेमाचा द्वेष करू नका
प्रेमासाठी दुसऱ्यांना जाळू नका
प्रेमासाठी स्वत:ही जळू नका
प्रेम आईचं असतं
बहिण-भावाचं असतं
पती-पत्नीचं,
प्रियकर-प्रेयसीच असतं
ते कधीही बाजारात मिळत नसतं.

**- श्रीधर उर्फ सचिन पाटील**
बी. ए. भाग दोन



## माफीचा साक्षीदार

देशाचा खून होताना मी पाहिला आहे.
माफीचा साक्षीदार मी जबाब देणार आहे.
मताचा बाजार मांडत
विवेकशून्यता हरवून बसलो.
सत्तेच्या खुर्चीवर
मवाल्याला नेऊन बसवलो.
देशाच्या तिरडीची मीच तयारी केली आहे.
माफीचा साक्षीदार मी खरा गुन्हेगार आहे.
सहकाराचा महामेरू म्हणत
स्वाहाकारी झाला आहे.
देशाचा गळा दाबून
सरंजाम झाला आहे.
जनतेच्या पैशाचा मालक म्हणून मिरवत आहे.
माफीचा साक्षीदार मी लूटमार सारी सोसत आहे.
हुकुमशाही राजेशाहीची फळे
इतिहासाने चाखली आहेत.
खरं काय? खोटं काय?
घटनेत जान आहे.
देशाच जीवदान मित्रानों तुमच्या हातात आहे.
माफीचा साक्षीदार मी तुमच्या साथीला आहे।

**- सारिका अनंत सावंत**
बी. ए. भाग एक

## बात मैत्रीची

तुझ्याशी मैत्री म्हणजे
वेगळीच बात आहे
कारण,
सुख आणि दु:खात
आपल्या दोघांची साथ आहे...!

**- गोरख पाटील**
बी. ए. भाग एक

## प्रेम

फुलणाऱ्या कळीला, उगाचच तोडायचं नसतं।
कारण त्यातसुद्धा मधुऋतूचं स्वप्न असतं
वाहणाऱ्या नदीला उगाचच आडवायचं नसतं.
कारण त्यात सुद्धा समुद्राचं सामर्थ्य असतं.
हंबरणाऱ्या गाईला उगाचच आडवायचं नसतं.
कारण त्यातही सुद्धा अर्धगीत असतं.
तसंच मनातल्या प्रेमाला उगाच आडवायचं नसतं
कारण त्यावरही कोणीतरी झुरणारं असतं.

**- सुयोग साळोखे**
बी. एस्सी. भाग दोन

## दहशतवाद एक आव्हान

नव्या उमेदीची, नवी सकाळ झाली,
धावपळीच्या जीवनास लोकं सज्ज झाली.
पण या लोकांना जगण्याची नाही खात्री,
आणि तेच झाले एका रात्री.
'ताज'वरील हल्ल्याने सारी मुंबई गेली हादरून,
पण जवानांच्या साथीमुळे गेली नाही घाबरून.
कारण, दहशतवादी हल्ले झाले
यात किती आले अन् किती गेले
भारतीय म्हणाले एक दिवस मरायचेय खरे,
मग शहिद होवून मेलेलेच बरे
या हल्ल्यातील सर्व शहीद जवानांना
माझा कोटी कोटी प्रणाम!

**- राजश्री रामचंद्र पाटील**
बी. ए. भाग दोन

## तू आणि मी

मी अशीच खट्याळ नदीसारखी
तू मात्र गंभीर सागरासारखा

मी अशीच अवखळ वाऱ्यासारखी
तू मात्र निश्चल पर्वतासारखा

मी अशी स्वच्छंदी फुलपाखरासारखी
तू मात्र अविचल कमळासारखा

मी अशीच मनस्वी मेनकेसारखी
तू मात्र तपस्वी विश्वमित्रासारखा

सृष्टीतील ही दोन नाती आहेत अशी खास
एकमेकांसाठी जगण्याचा असतो त्यांना ध्यास।

**- शितल सदाशिव चौगले**
बी. ए. भाग दोन

## परत कर

परत कर ते दिवस
जे तुझ्यासाठी वाया गेले.
परत कर ते क्षण
जे तुझ्यासाठी घालवले होते.
परत कर ती नजर
जी तुझ्यासाठी खिळली होती
परत कर ते मन
जे तुझ्यासाठी झुरले होते.
परत कर ती काया
जी तुझ्यासाठी झिजली होती
परत कर ते स्वप्न
जे तुझ्यासाठी पाहिले होते
परत कर ते अश्रू
जे तुझ्यासाठी वाहिले होते.

**- प्रकाश पाटील**
बी. ए. भाग दोन

## नशीब

जी माणसे हवीशी वाटतात
ती कधी भेटत नाहीत
जी माणसे नकोशी वाटतात
त्यांचा सहवास संपत नाही
ज्यांच्याकडे जावेसे वाटते
त्यांच्याकडे जायला जमत नाही
ज्याच्याकडे जाऊ नये असे वाटते
त्यांच्याकडे जावेच लागते
जेव्हा जीवन नकोसे वाटते
तेव्हा वेळ संपत नाही
जेव्हा जीवनाचा अर्थ कळतो
तेव्हा वेळ संपलेली असते
नशीब हे असच असतं
त्याच्याशी जपून वागावं लागतं
तिथे कोणाचे चालत नाही
नशीब जिकडे नेईल तिकडे जावेच लागते

**- आश्विनी शेणवी**
बी. ए. भाग दोन

## कोणीतरी... कुठेतरी...!

असं कोणीतरी....
ज्याला तुमचा अभिमान वाटतो
कोणीतरी...
ज्याला फक्त तुम्हालाच फक्त तुम्हालाच
काहीतरी सांगायचं असतं
कोणीतरी...
जो तुमचं ऋण घेवूनच वावरतो
ज्याला तुम्ही कधी मदतीचा हात दिला होता.
कोणीतरी....
जो तुमच्या यशाचा उत्सव स्वत:च साजरा करतो
जो तुम्हाला गिफ्ट देण्यास आतूर असतो.
कोणीतरी....
ज्याला केवळ तुमच्याच सोबतीनं आनंदाचा
अनुभव येतो...
ज्याच्यासाठी तुम्हीच सर्व काही असता
कोणीतरी....
जो तुमचा शब्द झेलण्यासाठी आतूर आहे.
तुमचा शब्द हा त्यासाठी प्राण आहे.
कोणीतरी....
ज्याच्या हृदयात तुमचंच वास्तव्य असतं
ज्याला तुमच्या साथीनं त्याची स्वप्नं
साकार होताना पाहायची असतात.
कोणीतरी....
केवळ तुमची मैत्री आणि तुमच्या प्रेमाच्या
कटाक्षासाठीही जो देवाला साकडे घालत असतो.
कोणीतरी...
ज्याला तुम्ही जसे आहात तसे मनापासून हवे
असता. तुमच्या सावलीतही धन्यता मानतात.
कोणीतरी...
ज्याला तुम्हाला सांगायचं असतं आज मी
जिथे उभा आहे ते तुमच्यामुळे आहे.
ज्याचं कोणीतरी... अस्तित्वही केवळ तुमच्यासाठी
आणि तुमच्यामुळेच असतं.
ज्याचा तुमच्यावर भरवसा, विश्वास असतो.
कोणीतरी...
तुमच्या नुसत्या कटाक्षासाठीही युगानूयुग
वाट पाहण्याची ज्याची तयारी असते
कोणीतरी...
ज्याच्यासाठी तुम्ही म्हणजे सर्वस्व असता
अगदी आता या क्षणीसुद्धा!

**- सुषमा गणपती पाटील**
बी. ए. भाग दोन

## माय बापाची कहाणी

ऐका ऐका दोस्तानो माय बापाची कहाणी,
बाप नारळी खोबर, माय नारळाचं पाणी।।धु।।

माय नेसती लुगडं, दोन-तीन ढिगळाचं
त्याला पुराण ठिगळं भल्या-भल्या आभाळाचं.

साधीसुधी माझी माय. तिची साधी राहणी
बाप नारळी खोबरं मायं नारळाचं पाणी ।।१।।

साधा-सुधा माझा बाप. त्याचं साधच धोतर
कुडता फाटलेला. त्याचा बाहेर येतोय खोपर

त्याच्या बुटाची ही काया, द्यावी चांगली निशाणी
बाप नारळी खोबरं, माय नारळाचं पाणी।।२।।

एकदा माय-बापामधी पैज अशी ही लागली
सांग कुणावाणी पोर, सांग कुणाची सावली.

थोडं लाजून थोडं हसून माय बोलली थोडा-थोडा तुझ्यावाणी
बाप नारळी खोबरं. माय नारळाचं पाणी।।३।।

माय म्हणे माझ्या लेका, सून साधी भोळी अनं
गुण आपल्यावाणी जिचं रुप गोरंपान

अन् थोडीशी ती येडी, अन् थोडीशी ती शाणी
बाप नारळी खोबरं, माय नारळाचं पाणी।।४।।

स्वप्नं बघतात दोघे ल्योक भला मोठा होईल.
सुख पायाशी त्याच्या, दुधा तुपात नाहील.

खूप कमावील नाव. खूप कमावील वाणी
बाप नारळी खोबरं. माय नारळाचं पाणी।।५।।

**- महेश (पवन) पाटील**
बी. ए. भाग दोन



## मैत्री

पुसटशी आठवण ठेवून जा
नको द्वेष करू,
प्रेमाची हाक देवून जा,
मनाला माझ्या नको असे जाळू
तुषार दवबिंदुचे उडवीत जा
झालर हिरवळीची ओढून जा
समजत असेल तर समजून जा
चिमणा घास घेवून जा
नको तिरस्कार करू,
मैत्रीचा हात देवून जा.

**- प्रविण ढोके**
बी. ए. भाग दोन

## संदेश

डोळे हे फिल्मी गडे
रोखून मुलींकडे पाहू नका
पाठीमागे फिरून त्यांच्या
सोन्यासारखा वेळ तुमचा
फुकट वाया घालवू नका

होकार नव्हे सर्वस्व गडे
रोज उठून होकाराची
वाट तुम्ही पाहू नका
त्यांच्या नकारामध्ये पण
होकार तुम्ही समजू नका

प्रेम नव्हे सर्वस्व गडे
प्रेमभंगाला बळी पडू नका
स्वत: वाया जावू नका
त्यांना बदनाम करू नका

अभ्यास हा सर्वस्व गडे
त्याकडे दुर्लक्ष करू नका
परीक्षेत नापास झालात म्हणून
दुसऱ्यांना दोष देवू नका

खूप खूप अभ्यास करून
आई-वडिलांचं नाव उज्ज्वल करा
त्यातच तुमचं भलं आहे
हे कधीही विसरू नका

**- पुनम विलास मोरे**
बी. ए. भाग तीन

## आई

आई म्हणजे हास्य
आई म्हणजे प्रेम
सर्वांसाठी झिजायचं
हाच असतो तिचा नेम
आई म्हणजे त्याग
आई म्हणजे माया
साऱ्या घरावरती
तिचीच असते छाया.
आई म्हणजे दैवत
आई म्हणजे वात्सल्य.
वाटतं फक्त तिच्यासाठी
सरू नये कधी आपले बाल्य
आई असते आपली शिडी
आई असते जादूची कांडी
आपलं दु:ख विसरायला
लागतेच ना तिचीच मांडी
आई सगळीकडे व्यापलेली
तरी कधीच न थकलेली

**- सीमा संकपाळ**
बी. ए. भाग तीन

## लगीन घाई



साखरपुडा उरकला बाई
सुरू झाली लगीन घाई
भडजीला सांगितले मुहूर्त काढा
तो म्हणतो मुहूर्त लवकर नाही।

नवरा म्हणतो मला आहे घाई
नवरी म्हणते धीर धरा वाईस
सासू म्हणते सून सांभाळल का
सून म्हणते सासू खाष्ट आहे का।

जावई म्हणतो हुंडा किती देता
सासरा म्हणतो खात्यात कमिशन किती घेता
आई म्हणते माझ्या लेकीला सांभाळा
सासू म्हणते जावयाला पण लक्ष ठेवा।

मुहूर्त एकदासा मिळाला
लग्नाचा गाडा उरकला
संसाराला सुरुवात झाली
काही दिवस सुखात गेले।

नंतर...
नवरा म्हणतो नसती नशीबाला लागली
बायको म्हणते कुठून पदरात पडला
सासू म्हणते सूनेला वळण न्हाय
सून म्हणते सासूला चाड नाही।

जावई म्हणतो हुंडा कमी
सासरा म्हणतो कमिशन मध्ये भर घाला
आई म्हणते लेकीचं चांगलं न्हाय सासर
सासू म्हणते लेकीच्या नाकात
घाला आधी वेसन।
अशी लगीन घाई
उरकली बाई लगीन घाई.



- **आश्विनी अमर कावणेकर**
बी. ए. भाग दोन

## जीवन

प्रत्येकजण जीवन जगत असतो
उद्याच्या आशेवर
आशेचा किरण त्याला
दिसतो पुढील भविष्यावर
जीवनामध्ये सुखदुःखाचे
चक्र चालूच असते
ते जीवनाचा अंत होईपर्यंत
चालूच राहते.
जीवनात कळत नकळत
कांहीतरी घडत असते
क्षणभंगूर जीवन
क्षणात संपते
कांही व्यक्ती जीवनात
खूप काही करून जातात
जाताना मात्र आपल्या
स्मृती मागे ठेवून जातात

**- सविता मारुती पाटील**
बी. ए. भाग तीन

## आपलं कोल्हापूर

खळखळत्या जीवनाचं निर्झर कोल्हापूर
मनातल्या माणुसकीचा पाझर म्हणजे कोल्हापूर
रंकाळ्याचा वारा म्हणजे कोल्हापूर
पन्हाळ्याच्या धारा म्हणजे कोल्हापूर
खासबागेतील कुस्ती म्हणजे कोल्हापूर
जेवल्यानंतरची सुस्ती म्हणजे कोल्हापूर
चपलेपासून, फेट्यापर्यंत, मातीचा सुगंध म्हणजे कोल्हापूर
मनानं, शरीरानं, आत्म्यानं बेधुंद म्हणजे कोल्हापूर
मिसळीचं वाटणं म्हणजे कोल्हापूर
पांढऱ्या रश्यातलं मटण म्हणजे कोल्हापूर
पव्या, सया, दया म्हणजे कोल्हापूर
रव्या, पम्या, किस्न्या म्हणजे कोल्हापूर
शिव्यामधलं प्रेम म्हणजे कोल्हापूर
शाहिरीचा बाज म्हणजे कोल्हापूर
गळ्यातील साज म्हणजे कोल्हापूर.
मातीमध्ये पसरलेला गंध म्हणजे कोल्हापूर
नखशिखांत रांगडंपण म्हणजे कोल्हापूर.
टी. एन. च्या कँटीनचा चुनचुनीत चहा म्हणजे कोल्हापूर
कॉलेजवरील झणझणीत वातावरण म्हणजे कोल्हापूर
क्षणोक्षणी जिथे.... तिथे....
भरपूर... पुरेपूर...
ते म्हणजे... माझं कोल्हापूर.

**- दयानंद पाटील**
बी. ए. भाग तीन



## इच्छा!

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही
माझी प्रार्थना नाही
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा
माझ्या दु:खी व्यथित मनाचं तू सांत्वन कर
अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर मला जय मिळवता यावा
एवढीच माझी इच्छा
माझ्या मदतीला कोणी आले नाही तरी
माझी तक्रार नाही
माझं बळ मोडून पडू नये
एवढीच माझी इच्छा
माझी फसवणूक झाली तर तू मला सावरावं
अशी माझी अपेक्षा नाही
माझं मन खंबीर रहावं
एवढीच माझी इच्छा
माझं तारण तू करावंस, मला तारावंस
ही माझी प्रार्थना नाही
तरुण जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा
माझं ओझं हलकं करून तु माझं सांत्वन केलं नाहीस
तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वहाण्याची शक्ती मात्र माझ्यात असावी
एवढीच माझी इच्छा!
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन मी तुझा
चेहरा ओळखून काढीनच
मात्र दु:खाच्या रात्री सारं जग जेव्हा माझी
फसवणूक करेल
तेव्हा तुझ्या विषयी माझ्या मनात शंका निर्माण
होऊ नये एवढीच माझी इच्छा!

**- माधुरी रघुनाथ वागवेकर**
बी. ए. भाग तीन

## कॉलेजला येतेस...

कॉलेजला जातेस,
कॉलेजचा महिमा गाजवण्यासाठी
पंजाबी ड्रेस अंगावरती,
ओढणी लोबंते रस्त्यावरती
काळी सॅक खांद्यावरती,
केस उडवतेस वाऱ्यावरती,
पावडर लावतेस गालावरती,
लिप्स्टीक लावते ओठावरती
सर्व कॉलेजची नजर तुझ्यावरती,
पण तुझी नजर माझ्यावरती
तुझी नजर माझ्यावरती

**- निलेश भिऊंगडे**
बी. एस्सी भाग तीन

## प्रेम

प्रेम असतं नि:शद्ब
शद्बांनाही न सापडणारं
प्रेम असतं गुपित
कोणालाही न उलगडणारं
प्रेम असतं भावनिक
स्पर्शालाही न कळणारं
प्रेम असतं जीवन
मरणानेही न संपणारं।

**- रणजित खोत**
बी. ए. भाग दोन

## भिमा तुझ्या जन्मामुळे

भिमा तुझ्या जन्मामुळे
झालो आम्ही माणसे
नाहीतर राहिलो असतो
गुलाम उच्चवर्णियांचे...

माणूस असूनही नव्हती किंमत
माणसाची...
ती किंमत मिळवून दिली तुम्ही.
भिमा तू केलास गुलामाला जागा
म्हणून तर सुटली लोटकी गळ्यातली
पळून गेला भेदभाव स्पृश्य-अस्पृश्यतेचा
भिमा फक्त तुझ्या जन्मामुळे...

दिली खुली करून तुम्ही वाट शिक्षणाची
नाही सर सोडली नसती वाट ढोर ओढण्याची
खरच भिमा तू केलास शहाणा समाज
नाहीतरी गावकी करत बसलो असतो..

करून दहन मनुसारख्या भयानक संकटाचे
रक्षण केलेत तुम्ही बहुजणांचे.
म्हणूनच जगतो आम्ही ताठ मानेने...

तुम्ही होता विद्वान म्हणूनी
घटना लिहून दिली देशाला
तुझे आभाळाएवढे उपकार
नाही विसरू शकणार...

**- विजय जयसिंग कांवळे**
बी. ए. भाग दोन

## मैत्रिण

मनात एक इच्छा आहे
कोणीतरी मैत्रिण असावी
थोडीशी भावूक, थोडीशी विनोदी,
निस्वार्थी प्रेम करणारी असावी
रंग रुप काहीही असो,
हुशार, भोळी काहीही असो,
सुसंस्कारीत मात्र असावी.
गरीब, श्रीमंत कोणीही असो,
गर्विष्ट मात्र नसावी
धडधाकट नसली तरी चालेल
पण दुःख समजणारी असावी
नम्र स्वभावाची, सुशील
वर्तनाची, प्रेमळ स्वभावाची
पण जीवनात एक
जिवाभावाची मैत्रीण असावी.

**- तानाजी आनंदा परीट**
बी. ए. भाग तीन

## जाता जाता

भरून येतं आभाळ
पण पडत नाही पाऊस
तुझ्यासाठी काळजामध्ये
बांधलं होतं हाऊस।।

तुझं माझं भांडण झालं की
तु रडून घ्यायचीस खूप
माझे डोळेही घ्यायचे मग
आभाळाचं रुप।।

तुझं खोटं खोटं रडणं पोरी
तेव्हाच का कळलं नाही?
सारं काही कळण्याआधी
काळीज का जळलं नाही?।।

हात माझा हातात घेऊन
स्वप्न किती सजवायचीस
खोटी स्वप्न सांगतानाही
पापणकाठ भिजवायचीस।।

खांद्यावरती मान,
काळजात मारलास बाण,
जाता जाता पोरी तू
पेटवून गेलीस रान....।।

**- विशाल पाटील**
बी. एससी. भाग दोन

## नवयुवक

या भारत देशाला नवयुवक हवाय
महात्मा गांधींच्या तत्वावर चालणारा
अहिंसात्मक मार्गाने अन्यायाशी झुंजणारा
मागास जनतेला पुढे आणणाऱ्या
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा
पुढाकार घेणारा नवा नेता हवाय.
म. फुलेंसारखे शिक्षणाचे द्वार
सर्वांसाठी खुले करणारा
सर्वत्र ज्ञानज्योत पेटवणारा
ज्ञानयोगी हवाय.
अतिरेक्यांशी लढण्यासाठी
शिवबासारखा गनिमी काव्याने
लढणारा नव युवक हवाय.
गरीब जनतेच्या हितासाठी
सुभाष बाबुंसारखाच नेता हवाय.
खरंच या भारत देशाला पुन्हा एकदा
नवचैतन्याने भरलेला
नवयुवक हवाय.

**- कोमल विष्णू परीट**
बी. ए. भाग दोन



## ♥ प्रेम

प्रेम...
प्रेम असावं
झुळझुळणाऱ्या वाऱ्यासारखं
पानाफुलांना
क्षणात डोलवणारं
स्वच्छंद निर्मळ असं...
अस्तित्वाची जाणीवही न देता
स्वरांच्या हिंदोळ्यावर
डुलायला लावणारं असावं प्रेम...
प्रेम...
निर्व्याजपणे
दुःखावर फुंकर घालून
मायेचा थंडावा देणारं असावं...
प्रेम...
आंधळं असावं इतकं की
मनाच्या गाभाऱ्यात
असंख्य डोळ्यांना
डोळसपणे शोधता यावं....
विवेकानं द्यावं
विवेकानं घ्यावं
आदर्श ठरावा प्रत्येक क्षण
केवळ स्वतःसाठी नको
तर....
माणसा माणसांसाठी
चिरंतन
आठवणी जागवणारं...

**- शितल बाजीराव पाटील**
बी. ए. भाग तीन



## नातं

नातं कधी कोणाशी जोडू नये
मन कधी कोणाचे मोडू नये
काही लोक नाती जोडतात
मन घेऊन मनामध्ये राहतात
अन् दुसरच कोणाला तरी
आपलं मानतात.
त्याच्या मनात काय असते ते
आपण सांगू शकत नाही. कारण
त्यावेळी आपण नातं जोडलेलं असतं.
त्याच्या मासूम डोळ्यातील भाव
ओळखताच येत नाहीत. त्याच्या
खोट्या शद्बातही खरेपण जाणवते
पण त्यावेळी मात्र खूप उशीर
झालेला असतो. कारण आपण
मात्र त्यांना प्राण समजून
बसलेलो असतो.

**- रुपाली फराकटे**
बी. ए. भाग तीन

## माझे महाविद्यालय

दूधसाखर महाविद्यालयात
येताना उदासिन कधी व्हायचं नसतं,
जरी उदास असलात तरी सदासर्वदा
हसायचं असतं, हसवायचं असतं.

इथल्या शद्बाच्या मान्यांनी घायाळ
कधी व्हायचं नसतं,
इथल्या मधूर प्रितीने नेहमी
मोहीत व्हायचं असतं.

स्पर्धेत अयशस्वी झालात म्हणून
हताश कधीच व्हायचं नसतं,
नव्या उमेदिनं प्रयत्न करू
असंच नेहमी म्हणायचं असतं.

काटा बनून कधी कुणाच्या
मार्गात यायचं नसतं
नेहमी फूल बनून आपण
ऐक्य साधायचं असतं.

हेच शिकलो इथेच आपण
हे कधी विसरायचं नसतं, विसरायचं नसतं.

**- सुभाष पाटील**
बी. ए. भाग तीन

## जीवन

जीवन सारे जगताना
कधी दु:खी व्हायचं नसतं,
उरी वेदना होतानाही
सदा हसायचं असतं.

काटा कुणाच्या मार्गी
कधी बनायचं नसतं,
फुल बनून या जगी
सुखवायचं असतं.

ओझं आपलं दु:खाचं
कोणावर लादायचं नसतं,
घेता आलं तर कोणाचं
दु:ख घ्यायचं असतं.

धैर्यानं कार्य करता करता
स्वयं प्रकाशित व्हायचं असतं,
जीवन असं जगायचं असतं
मानव जन्माचं सार्थक करायचं असतं.

**- अश्विनी नानासो पाटील**
बी. ए. भाग तीन



## जीवन हे असेच असते

नाते फक्त जोडायचे नसते
ते जोपासायचे असते।
डाव फक्त मोडायचा नसतो
डाव स्वत:ही मांडायचा असतो
प्रेमात फक्त गुंतवायचे नसते
प्रेम स्वत:ही निभावायचे असते।
स्वत:साठी केवळ दुसऱ्यांच्याच डोळ्यात
अश्रू आणायचे नसतात,
केव्हातरी कोणासाठी स्वत:च्या डोळ्यांतही
अश्रू वाहायचे असतात
जीवन हे असेच असते,
जीवन हे असेच असते
कधी दुसऱ्याला स्वत:मध्ये गुंतवायचे असते।
तर; कधी स्वत:च दुसऱ्यामध्ये गुंतायचे असते।

**- संदीप चौगले**
बी. एस्सी भाग दोन

## राजा शिवाजी

कधीच ना आटिला तो शिवरूपी झरा,
बदलवूनी टाकीला त्याने आपुला समाज हा सारा!
याच माणसांना त्याने
खरे माणसात आणिले
याच समाजात त्याने
समतेचे बीज पेरीले
वंदन करूया आम्ही त्या महान शिवसागरा!
बदलवूनी टाकिला...
एक एक खेळ त्याने
खेळले बुद्धीचे
सर्वांसमोर दोन हात
केले त्या काफरांचे
मराठा बांधवांसाठी झिजला चंदनासारा
बदलवूनी टाकीला....
करुनिया पाणी त्यांनी
आपुल्या अनमोल रक्ताचे
सुख ना पाहिले कधी त्याचे
ना आपुल्या स्वत:चे
लाविला समाजात आपल्या खरा मर्दानीपणाचा दिवा...
मराठ्यांसाठीच जगला
मराठ्यांसाठीच गेला
महाराष्ट्रातील मराठ्यांसाठी
हिरवाही भगवा केला.
कोटी कोटी प्रणाम त्या मर्दमराठ्याला,
बदलवूनी टाकिला...

**- सुनील तोरस्कर**
बी. एस्सी भाग दोन

## जिवाचा जीवलग हवाच!

जन्माला माणूस
एकटा येतो अन्
जाताना एकटा जातो, पण
म्हणून काही मधल्या
काळातही एकटेपणाच्या
शापाला कवटाळून बसावं?
कधी रडण्यासाठी, कधी
हसण्यासाठी, कधी मनातलं
गुपित खोलण्यासाठी, कधी
विश्वासानं खांद्यावर डोकं
टेकण्यासाठी, योग्य तिथं
लगाम घालण्यासाठी, नि
वेळ येताच चुचकारून पुढं
टाच देण्यासाठी... प्रत्येकाला
प्रत्येकाचा एखादा तरी
जिवाचा जीवलग असावाच!
आपल्याही जिवाला जीव
देणारं कोणी आहे ही
भावनाच भरारी मारताना
तुमच्या पंखांना नवं बळ
देईल, पुढं गेल्या नंतरही
मागची ओढ राहील आणि
प्रेम - जिव्हाळा - काळजी
आपुलकी याचा ओलावा
तुमच्या हृदयात राहील.
म्हणूनच
जीवाचा जीवलग हवाच!

**- अभिजित चरापले**
बी. ए. भाग एक

## तर आज मी जवंत असते

मरणाच्या काठावर बसून
जगण्याचं स्वप्नं पाहत होते...
'तू' नसतानाही... तुझ्यातच जगत होते.
मरणाऱ्या काठावरून आयुष्य सुंदर दिसत होते.
आपण जगावे असे पुन्हा-पुन्हा वाटत होते.
दुःखाच्या दऱ्या संपताच सुखाचे झरे येणार होते
पण... दुःखाच्या दऱ्या इतक्या खोल झाल्या,
की तरुण जाणे कठिण होते.
सातत्य होते श्रावण धारेत, मेघही दाटले होते
'मी' वेडी प्रकाशाच्या आशेत होते...
अमावस्याचे थैमान चालूच होते.
मनात तुझ्या प्रेमाचे नंदादिप तेवत होते.
धीर धर जरा किनारा जवळ आहे
असेच जणू सांगत होते.
तुझ्याशिवाय जगते तर श्वासाला अर्थ नव्हते
विना अर्थाचे जीवन 'मी' कधीच जगले नव्हते
विसरणे तुला जमणार नव्हते
तुझ्याशिवाय जगणारही नव्हते
विझणेच मला परवडणार होते
माझे जीवन हे फक्त तुझेच होते
हे फक्त एकदाच घरच्यांना उमजले असते
तर आज मी जिवंत असते!"

**- दत्ता पाटील**
बी. ए. भाग एक

## हे खरं ना!

भावी पिढी बिघडली, असं सध्या बोललं जातं
पण देश मात्र सुधारला असं आज म्हटलं जातं।।१।।

सुधारणं नि बिघडणं, हे अव्याहत घडणारच
यातून काही शिकला नाही
तर त्याचं घोडं अडणारच।।२।।

चुका पण त्यातून शिका, असं शहाणा बोलून जातो
चुकण्यामधून शिकणारा
खूप कांही शिकून जातो।।३।।

अदिपासून अंतापर्यंत, असच सारं घडत आलं
तरी उत्तरोत्तर माणसाचं पाऊल पुढचं पडत आलं।।४।।

चुकाल तरच शिकाल, शिकाल तरच टिकाल
हाच जीवनाचा खरा मंत्र, हेच जीवनाचे खरे तंत्र।।५।।

या स्पर्धेच्या युगामध्ये, माणूस कितीही धावला
तरी तो निसर्गाच्यापुढे हमखास हरणारच।।६।।

आणि समजा तो जिंकलाच
तरी परतीच्या प्रवासात
त्याचे यादीत नाव हमखास नसणारच।।७।।

निसर्ग आपला मित्र असला
तरी त्याला आपण गुरु मानतो
निसर्गाची 'ताकद' काय?
हेही आपण प्रत्येकजण जाणतो

- अमोल भि. पाटील
बी. ए. भाग तीन





## प्रेम

उमलता उमलता
असंच कळीनं उमलायचं असतं
बहरता-बहरता
असच झाडाने बहरायचं असतं
बोलता-बोलता
असच नयनानी बोलायचं असतं
यालाच मग
खरं प्रेम म्हणायचं असतं
प्रेम म्हणायचं असतं

- अमर भास्कर कांबळे
बी. ए. भाग दोन

## माझ्या यशाच्या शिखरावरती

सांजकाळी जसं
आकाशातून अलगद
सोनेरी किरणं येतं
तसंच कोणीतरी
माझ्या आयुष्यात यावं.
सोन्याच्या उंबरठ्यावरती
त्याच पाऊल पडावं
सोनेरी पावलांनी
माझ्या आयुष्यात
पदार्पण करावं.
मला कुणीतरी साथ देणारं
मला कुणीतरी प्रेरणा देणारं असावं.
उजळून टाकाव्यात वाटा
उजळून टाकाव्यात चारही दिशा
अन् माझ्या यशाच्या
शिखरावरती मी
त्याचं नाव सांगावं.

**- स्मिता शा. व्हरवडेकर (पाटील)**
बी. एस्सी. भाग तीन

## 'ती' आणि एकांत

कळलच नाही प्रेमामध्ये
एकमेकांची मनं केव्हा एक झाली
आणि एकांतातसुद्धा मला
फक्त तिचीच आठवण आली.
एकांतात मला ती खूप आवडायची...
कारण एकांतात ती खूप सुंदर दिसायची...
एकांतातील 'ती' आणि प्रत्यक्षातील 'ती'
खूपच वेगळी होती.
कारण, एकांतात ती माझ्याशी खूप बोलायची
प्रत्यक्षात मात्र अबोलच रहायची..
ती माझ्यापुढे प्रश्नांची रास रचायची..
प्रत्येक प्रश्नांमध्ये प्रिती दडलेली असायची.
मला नक्कीच वाटायचं
तिच्या प्रत्येक प्रश्नामध्ये
माझं प्रेम जाणून घेण्याची इच्छा आहे
म्हणूनच तर, माझ्या प्रेयसीचं नांव
'जिज्ञासा' आहे.

**- अश्विनी प्रकाश पाटील**
बी. ए. भाग तीन

## मैत्री

मैत्री एक अतूट नातं असतं
मैत्री ही एका कोड्याप्रमाणे असते,
जणू ते कोडे
कधी सुटेल की नाही
याची भीती असते.

त्या कोड्यात असणाऱ्या प्रत्येक
शद्वात गोडी असते.
सु:ख, दु:ख, आनंद, चूक, बरोबर
हे त्यातील चढउतार असतात
डोळ्यातून कधीही अश्रू पडू द्यायचे नाहीत
एक जगावेळी शपथ असते.

एकमेकांना समजून घेणे
हा एक मनस्वी
प्रयत्न चाललेला असतो.

पडणाऱ्याला सावरणं आणि
दु:खावर फुंकर घालणं
हा तर त्या नात्यातील
गोडवा असतो.

मित्रांना विसरणं ही गोष्ट
म्हणजे जगावेगळी संकल्पना असते.
आठवण आली म्हणून उचकी लागली
यात थोडी लाडीगोडी असते.

- स्वप्नाली केरवा मांडवकर
बी. ए. भाग दोन

## आई

प्रेम, दया, शांतीचा स्त्रोत
सोशिकतेनं भरलेलं मन,
सर्वांना सामावून घेण्याची हातोटी...
तिच्या डोळ्यात पाहिलं की,
शांतरस टपकतो...
संकट कितीही येवोत वादळ वाटेतून
तिचा असाच संथ प्रवास...
जबाबदारीनं वाकलेली, पण
ताठ मानेनं जगायला शिकवणारी.
सत्यतेची आग्रही,
कटूतेला सामोरी जाणारी
ती एकदाच भेटते; आयुष्यात
जगण्याचं गुपित तिच्यातच दडलेलं
तिचं अस्तित्व आधार देणारं....
बुडत्याला सावरणारं,
संयमानं जगायला दिशा देणारं...
म्हणूनच,
ती एकदाच भेटते
मायेचा भवसागर घेऊन
विश्व घडवण्यासाठी
जगणं सुंदर करण्यासाठी...

- शिल्पा चौगले
बी. ए. भाग दोन



## जरा जपून

बोलताना जरा जपून बोलावं
कधी शब्दही अर्थ बदलतात,
चालताना जरा जपून चालावं
कधी रस्तेही घात करतात.

झुकताना जरा जपून झुकावं
कधी आपलेच खंजीर खुपसतात,
ओळखताना जरा जपून ओळखावं
कधी माणसे आपला रंग बदलतात.

पाऊल टाकताना जरा जपून टाकावं
कधी फुलेही काटे बनतात.

मागताना जरा जपून मागवं
कधी आपलेच भाव खातात,
नातं जोडताना जरा जपून जोडवं
कधी नकळत धागे तुटून जातात....
नकळत धागे तुटून जातात...

**- सचिन चौगले**
बी. एस्सी. भाग एक

## क्षण हे अखेरचे

सरू लागले क्षण हे अखेरचे
रम्य अशा कॉलेज जीवनाचे
इथेच आपली भेट जाहली
अन् निखळ अशी मैत्री बनली.
तीन वर्षं एकत्र राहूनही
मनालाही खूप भिडली
निरोप आम्ही देतो
दूधसाखर महाविद्यालयाला
आम्हा कधीही विसरू नका
स्वल्पविराम लागतो आहे मैत्रिला.
पूर्ण विराम तो बनवू नका
वळण नवे लागेल जीवनाला
सदैव प्रयत्नशिल राहून आपण
चढूनी यशाची उंच शिखरे
पुढे नेऊ समाजाला.

**- सागर आनंदा मोरे**
बी. एस्सी. भाग तीन

## माझी कविता आणि ती

एकही कविता तिला कळत नाही।।
ति माझ्याशी बोलायची,
रोज गोड हसायची,
मी रागात असताना
स्वत:शीच मात्र रुसायची.
तिच्या रोजच्या गमती,
मी त्यावर हसलो नाहीतर
लगेच फुगून बसायची.
मी लिहिलेली पहिली कविता,
रोज भांडून मागायची,
वाचल्यावर मात्र शांतपणे
माझ्याकडे पहायची.
एकदा म्हणाली ती...
तू माझ्यावर का कविता करत नाही???
तेव्हा कळलं मला
एकही कविता तिला कळत नाही

**- प्रविण (मोहन) चौगले**
बी. ए. भाग तीन

## आठवण

खरं सांगू, नेहमीच तुझी आठवण येते.
दु:खात तुझ्या जीव माझा हरवून जातो.
कुणास ठाऊक का
आपण इतके जवळ आलो
परस्परांच्या मनात शिरून
का इतके व्याकूळ झालो?
तुझ्याचसाठी आयुष्य माझे सुकले नाही.
वाटत होते फुलवावा
तुझ्या जीवनात बहर... पण
काटेरी आयुष्य माझं
वाट्याला दु:खच अपार.
शेवटी इतकेच सांगेन
मला जरुर आठवत जा
मिटल्या पापण्यांतून सांगावा
पाठवत जा...

**- स्मिता धोंडीराम पाटील**
बी. ए. भाग तीन

## दहशतवाद

आजकाल भ्रष्टाचाराच्या जगात
दंगल माजली हो, दंगल,
अतिरेक्यांच्या हल्ल्याने मुंबईत
दंगल माजली हो, दंगल,
नव्या उमेदीची सकाळ
अतिरेक्यांनी केली बकाल,
मुंबईतील लोक जीव हातात
घेऊन बाहेर असतात पण,
आज काय घडणार आहे,
हे त्यांना माहित नसतं.
दहशतवादी अतिरेक्यांनी
मुंबईवर केला गोळीबार
यात नव्या उमेदीची माणसे झाली ठार
'ताज' हॉटेल प्रसिद्ध पण
अतिरेक्यानी केले मस्सीद,
भारत महासत्ताधिशांच्या वाटचालीत
पण एवढ्यात,
दंगल माजली हो, दंगल
या अतिरेक्यांच्या हल्ल्यात मुख्यमंत्री कोण?
राजकारणी लोकांत
दंगल माजली हो, दंगल,
देशासाठी मेला तो अमर झाला
स्वत:साठी मेला तो लयास गेला,
निसर्गाचे ऋतूमान नाही बरोबर
या दहशतवादी जगात
दंगल माजली हो, दंगल

**- सुनीता महादेव तावडे**
बी. ए. भाग दोन

## मैत्री कशी असावी?

मैत्री ही मनाला सतत हुरहुरणारी
उत्कर्षाने हवीशी वाटणारी असावी.

परकी असली तरीही
सतत आपली जाणवणारी

मैत्री असावी सूर्यासारखी
सतत प्रकाशात झळाळणारी.

पूर्ण अबोल मनाची
मुक्या भावनांची

दु:खात साथ देणारी
सुखात सामावणारी.

सोनेरी चाफ्यासारखी
नाजूक पाकळ्यासारखी

कुठेही कशीही आठवली
तरीही प्रामाणिकपणाची.

निरागसतेने भरलेली
सात्त्विक वागणुकीची

मैत्री ही याच रुपात राहो
हीच माझी सदिच्छा!

**- शोभा रक्ताडे**
बी. ए. भाग दोन

## हसत रहा तु सदा

हसत रहा तू सदा
अडचणी येतील अनेकदा
कधी तुफान येईल कधी वादळ
निर्मल झऱ्याप्रमाणे नेहमी रहा खळखळत.
तुझे साहस हेच तुझं नशीब असेल
कदाचित होरपळून तुला वनव्यातून
बाहेर जायचे असेल.
भीत-भीत जगू नकोस
संकटाकडे पाठ फिरवू नकोस
दुसऱ्यांच्या नाशापासून काय मिळेल?
तळमळणारे आत्मे पाहायला मिळतील
रोज रोज मरू नकोस.
बलिदान देताना परमार्थ विसरू नकोस
हसत हसवत जीवन जगत रहा
आनंद अथवा दु:खात फुलत रहा
फुलता फुलता तू सर्वांना फुलवित रहा
फुलविताना तू क्षणिक सुगंध सर्वांना देत जा
हसत रहा तू सदा
हा जन्म नाही अनेकदा
हसत रहा तू सदा...

**- गणेश जाधव**
बी. ए. भाग दोन

## मन

मन हे असच वेडं असतं...
ते कधी इथं असतं
तर कधी तिथं असतं
ते कधी विरहात जळतं
तर कधी आठवणीत चिंब भिजतं.

मन हे असंच वेडं असतं.
कधी मनाप्रमाणे घडतं
तर कधी मनाविरुद्ध घडतं
आपल्याला हवं ते मिळणार नाही
हे जाणतं तरीही ते मृगजळामागे धावतं.

मन हे असंच असतं.
ते कधी दूर-दूर जातं
तर कधी खूप जवळ असतं.
कोणाला तरी ते वेड लावतं
तर कोणासाठी ते स्वत:च वेडं होतं
मन हे असंच असतं...

**- पूजा अनिल पाटील**
बी. ए. भाग दोन

## साथ तुझी

जीवनात काटेरी वनात
साथ तुझी हवी होती...,
मोडला जरी काटा तरी
काढणारा हात तुझा हवा होता...
ऊन जरी लागले तरी
प्रेमाची सावली तुझी हवी होती...,
जीवनाच्या त्या संघर्षात
साथ तुझी हवी होती....
संपली जरी शक्ती तरी
आधार तुझा हवा होता....,
जीवनरुपी नावेतून बुडताना
वाचवणारा हात तुझा हवा होता...
विस्तवल्या मनाच्या रानात
संकटाचे ऊन पडले तरी
साथ तुझी हवी होती...

**- अर्जुन उर्फ शरद खोत**
बी. ए. भाग दोन

## पुन्हा एकदा

क्षणभर मिटून डोळे
स्वप्न व्हावे
हरवल्या वाटांना
शोधीत जावे.
पुन्हा एकदा
श्वासात गाणे
गुंफीत गावे
पुन्हा एकदा.
आभाळ ओले
मिठीत घ्यावे
पुन्हा एकदा
तुटलेल्या धाग्यांना
जोडीत जावे.
पुन्हा एकदा
सुकलेल्या फांदीने
फुलून यावे
पुन्हा एकदा
पिकलेली गोड
आठवण व्हावे
पुन्हा एकदा.

**- जयश्री पाटील**
बी. ए. भाग तीन

# इतर

## EDUCATION (शिक्षण) या शब्दाचा अर्थ

कु. माधुरी भाले
बी. एस्सी. भाग दोन

शिक्षणाविषयक बांधववनातून व ईश्वरी महाकाव्यातून शिक्षण व जीवनासंबंधी जे व्यावहारिक जीवन-सत्य सांगितले आहे, ते इंग्रजी भाषेतील Education (शिक्षण) च्या नऊ अक्षरातून स्पष्ट करता येते.

**E- Etiquettes (शिष्टाचार)**

खऱ्या शिक्षणाने माणसात नम्रता, मधुरता इत्यादी गुण येतात. आई, वडील, शिक्षक व अन्य वडिलधाऱ्यांशी विनम्रतेने वागणे व आपल्याहून लहान असलेल्यांशी शिष्टाचारास धरून वागण्याचे ज्ञान शिक्षणाने प्राप्त होते.

**D- Discipline (शिस्त) :**

बाह्य शिस्तीबरोबर आंतरिक शिस्त म्हणजे मन, बुद्धी संस्काराची शिस्त किंवा विचार, उच्चार, आचारांची शिस्त, ही शिस्त शिक्षणाने अंगी बाणते.

**U-Universal brotherhood (विश्व बंधुत्व):**

जगात अनेक धर्माचे लोक असले तरी आत्मिक दृष्ट्या ती परमेश्वरांची मुले आहेत. अर्थात ते आपसात भाऊ-भाऊ आहेत. देश व धर्म यांच्याही पलिकडे गेल्याने विश्व बंधुत्वाची भावना शिक्षणाने जागृत होते.

**C- Creativity (सृजनशिलता):**

मूर्तीकार दगडात आपली भावना ओतून त्याची मूर्ती बनवण्याचा, त्यात जीवंतपणा आणण्याचा प्रयत्न करतो. त्याचप्रमाणे निकृष्टाला श्रेष्ठ बनवण्याचा, सृजनशिलतेचा गूण शिक्षणाने प्राप्त होतो.

**A- Alertness (जागरुकता):**

मनुष्याने मायेपासून (कामक्रोध विकारांपासून) सावध, अर्थात जागृत रहायला हवे. ही जागरुकता शिक्षणाने प्राप्त होते किंवा असेही म्हणता येईल की ईश्वरी ज्ञानाने माणसाचा आत्मरुपी दीपक प्रज्वलीत होतो. म्हणजे तिसरे नेत्र उघडते. "माणसाला मृत्यू अटळ आहे. तसेच आपण सृष्टीरुपी रंगमंचावरील नट आहोत.' यांचे ज्ञान जागरुक राहू शकते. ही जागरुकता शिक्षणाने प्राप्त होते.

**T-Transformation (परिवर्तन):**

शिक्षणाने माणसाचे मन परिवर्तन, संस्कार परिवर्तन घडून येते, तो एक जबाबदार नागरिक बनतो. शिक्षण माणसातील आसुरी वृत्तींचे दैवी वृत्तीत परिवर्तन घडवून आणते.

**I- Integrity (प्रामाणिकपणा):**

धर्मराजपुरीतील शिक्षेत्रापासून सुटका होण्यासाठी प्रामाणिकपणा हा गुण धारण करणे आवश्यक आहे. प्रामाणिकपणा हा गुण शिक्षणाने प्राप्त होतो!

**O- Optimism (आशावाद) :**

विघ्न ही माणसाची प्रगती व्हावी म्हणून येत असतात.हे ज्ञान प्राप्तझाल्याने मनुष्य आशावादी बनतो.

**N - Noble (थोरमन):**

सद्‌विद्येने अर्थात चांगल्या शिक्षणाने मनुष्य थोर मनाचा, उमद्या स्वभावाचा बनतो.

थोडक्यात शिष्टाचार, शिस्त, सृजनशीलता आदींवर उल्लेखिलेले गुण शिक्षणाने प्राप्त होतात.

(संदर्भ प्रकाशन : प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय - जीवनाची नवी दिशा पुस्तकातून संग्रहित)

# स्पंदन प्रकाशक व मालकीसंबंधी माहिती


| | | |
|---|---|---|
| ■ प्रकाशन स्थळ | : | दूधसाखर महाविद्यालय<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर. ४१६ २०८<br>फोन : (०२३२५) २५४८२२ |
| ■ प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| ■ प्रकाशक व प्रमुख संपादक | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| ■ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ■ पत्ता | : | दूधसाखर महाविद्यालय<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर. ४१६ २००८<br>फोन (०२३२५) २५४८२२ |
| ■ कार्यकारी संपादक | : | डॉ. एस. डी. पाटील |
| ■ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ■ पत्ता | : | दूधसाखर महाविद्यालय<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर. ४१६ २००८<br>फोन (०२३२५) २५४८२२ |
| ■ मुद्रक | : | श्रीपाद ऑफसेट, ४६४, ई, शाहूपुरी, कोल्हापूर. |
| ■ मुखपृष्ठ | : | श्री. राजेंद्र कदम |
| ■ संकल्पना | : | प्रा. डॉ. संजय पाटील |
| ■ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ■ पत्ता | : | व्हिनस कॉर्नर, शाहूपुरी, कोल्हापूर.<br>फोन : (०२३१) २६५८४०१ |

मी प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे.

\- प्रकाशक


या अंकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.



किस सीमातक किया करेगा
मनुज संकुचित अपना।
क्या वसुधा पर रह जायेगी
मानवता बन सपना ।।

- कोणार्क



# हिंदी विभाग

विभागीय संपादक

डॉ. एस. बी. देसाई

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | समय का सदुपयोग | वर्षाराणी वारके | ३ |
| २) | समाज जीवन में साहित्य का महत्त्व | वैशाली पाटील | ३ |
| ३) | ऐसा देश है मेरा | निता पाटील | ४ |
| ४) | वेधा और केतन | अर्चना चौगले | ५ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | चोट | अर्चना पाटील | ७ |
| २) | कुछ तो सीखो | गीतांजली चौगले | ७ |
| ३) | सोच... | भारती पावसकर | ८ |
| ४) | तीन बाते | पल्लवी पाटील | ९ |
| ५) | दोस्ती प्यार और हम | प्रविण चौगले | १० |
| ६) | आप की जगह | संदीप पाटील | ११ |
| ७) | झलक | शुभांगी पाटील | ११ |
| ८) | आँसू | प्रशांत बराडे | १२ |
| ९) | जिंदगी की सलाह | तेजस्वीनी ठोंबरे | १२ |
| १०) | आरजू | मेघराज फराकटे | १३ |
| ११) | याद | धनश्री पाटील | १४ |
| १२) | दोस्ती | संदीप परबकर | १४ |
| १३) | यह मेरा हिंदुस्थान है | संजय देसाई | १५ |
| १४) | वह कौन थी..? | पंडित फराकटे | १६ |
| १५) | बेवफा | प्रकाश शिंदे | १६ |
| १६) | मेरा भारत | सयाजी भोसले | १७ |
| १७) | प्यार का भूत | संग्राम किल्लेदार | १७ |
| १८) | सहारा | सुप्रिया राजू कांबळे | १७ |
| १९) | सपनोंकी राजकुमारी | अमित फराकटे | १८ |

# गद्य विभाग

## समय का सदुपयोग

वर्षाराणी प्रकाश वारके
बी. ए. भाग तीन

'संत कहते है,
''कल करे सो आज करे,
आज करे सो अब,
पल में पले होयगी,
बहुरी करौगे कब।''

इसका अर्थ है, हमे हर काम समय पर करना चाहिए। बीता समय कभी वापस नही आता। इसलिये समय का उचित उपयोग आवश्यक हो जाता है। समय को हम बलवान कहते है। समय को जो समझता है और उसका सदुपयोग करता है। वही इन्सान अपनी जिंदगी में सफल हो जाता है। जीवन का ही वक्त हमारे लिए किमती है। काल सबसे उपर है। वह सबको नष्ट करना चाहता है। हमे ऐसा लगता है, कि हम समय पर काबू पा सकते है। पर सच तो यह है कि समय हम पर हावी हो जाता है। जिसके हाथ समय की कुंजी लगी वह महान हो गए अमर हो गए। जैसे गांधीजी, विवेकानंदजी, न्यूटन, एडिसन।

इन्सान को चाहिए कि वह समय को पहचाने। इन्सान की जिंदगी में ऐसे कई मौके आते है, जब उसे ऐसा लगता है, कि यह दोबारा भी आ जायेगा। पर यह दोबारा नही आता। एक बार हाथ से फिसल जाने पर समय तुम्हारे लिए कुछ नही कर सकता। पर अगर समय के साथ तुम नही रहे थे। फिर मौके का फायदा नही उठाया तो तुम्हारा वक्त गुजर जाता है। मौके बार-बार नही आते। मौका एक बार ही आयेगा। अगर तुम उसे समझ सको तो ठीक है। वरना वह हाथ से फिसल जायेगा। ठीक समय पर काम करनेवाला व्यक्तिं दिन-ब-दिन आगे बढता है। हर एक क्षण को मूल्यवान या अंतिम क्षण समझकर काम करो, तो वह सार्थक हो जायेगा। इसलिए हर क्षण अंतिमक्षण मानकर चलो।

समय को बदलने की, नष्ट करने की कोशिश नही करनी चाहिए! समय हमे ही नष्ट कर देगा। विद्यार्थियों के जीवन में समय बहुत आवश्यक माना गया है। जो विद्यार्थी समय का सदुपयोग करता है, वह जीवनभर सुख, शांति और चैन से रह सकता है। समाज के लिए कुछ कर सकता है। समय का उचित उपयोग करने के लिए सबसे पहले जरुरी होता है, सुनियोंजित और सुचारु ढंग से काम करना। इससे काम से और साधनसे अभी सफलता निश्चित रुप से मिलती है। ■■

## समाज जीवन में साहित्य का महत्त्व

वैशाली पाटील
बी. ए. भाग तीन

समाज जीवन में साहित्य का महत्त्व इस विषयपर विचार आधुनिक काल में होना अनिवार्य है। समाज जीवन में साहित्य का महत्त्व अंत:करण में ऊंचे रुढ भक्ति प्रेम का, मूलगामी समाज परिवर्तन का, अवर्णनीय उच्च प्रति की शांति देनेवाला, मानवी योनी को अभिप्रेत होनेवाला, गंतव्यवस्थान के लिए सीधे होकर जानेवाले राजमार्ग की तरह सरल है। संदेह, दु:ख, विकल्प, ऐहिकता की ओस से भरी जीवनमार्गपर कुछ नही दिखाई पडा तो संतरुपी सूर्यनारायण उदित होता है और इस भटके हुए जीवों की भक्तिमार्ग, प्रबोधन का प्रकाश देकर मार्गदर्शन करता है। समाज जीवन में परिवर्तन का प्रयत्न करता है। सच देखा जाए तो जग में प्राचीन विद्वानों के साहित्य ने हमे बडा किया है, सही वर्तन दिया है, खुशी दी है, इन्सानियत दी है, उसके साथ-साथ सहृदयता,

उदारता, बंधुता, पुरुषार्थ, पावित्र्य, प्रेम, न्याय, भक्ति-मुक्ति और नीति दी है।

रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून।
पानी गये न उबरे, मोती मानस चून।।

यहाँपर रहीम 'पानी' के प्रतिक तीन महत्त्वपूर्ण संदेश मानव को देते है। जीवन में चमक, आत्मसन्मान और जल संभालकर रखने कहते है, अगर यह चला गया तो जीवन व्यर्थ है, इसके बिना जीवन में सब सूना है। इस तरह एक उच्च अभिरुची संपन्न जीवन जीने की प्रेरणा देनेवाले देव, देश, धर्म, इसके लिए त्याग, सेवा, समर्पण इनका सुंदर जीवनमार्ग प्रदशित करनेवाले, उदात्त जीवनमूल्यों की जीवन में प्रतिष्ठापना करने के लि हमेशा मार्गदर्शन करनेवाला प्राचीन साहित्य यह आ की समाज के लिए प्राणवायू के समान आवश्यक है समाज मन मे निकोप और निरामय वर्तन केवल संतसाहित्यों की संस्कार से हो सकता है ऐसा मेरा ठो विश्वास है। प्राचीन साहित्य का असाधारण महत्त्व समझकर उसके सर्वांगीन अभ्यास की, प्रबोधन की औ सामाजिक उपाययोजनों की बहुत बडी जरुरत आज निर्माण हुई ई, इसलिए ऐसे साहित्य के बारे में मंचप चर्चा होना अनिवार्य है। समाजजीवन में इसका महत्त्व जाना जरुरी है।

# ऐसा देश है मेरा

निता पाटील
बी. ए. भाग तीन

जहाँ डाल डाल पर
सोने की चिडियाँ करती है बसेरा
वो भारत देश है मेरा
वो भारत देश है मरा

जी हाँ, यही है मरा भारत देश। अब आपके मन में यह सवाल उठ रहा होगा कि, चिडियाँ कभी सोने की हो सकती है क्या? लेकिन हमारे भारत में कुछ भी आश्चर्य हो सकता है। यहीपर भगवान श्रीकृष्णजीने अपनी उंगली पर गोवर्धन पर्वत को उठाया था। यहींपर भगवान महावीर, बुद्ध, महात्मा गांधी जैसे कई महापुरुषोंका जन्म हुआ। ताजमहल जो कि, विश्व का आठवाँ आश्चर्य माना जाता है, वह भी भारत में ही है। हमारे भारत में ही तो सोने का धुआँ उठता है। या "East or West, India is the Best ही सच है।

सोने की चिडियाँ का गर्भित अर्थ है, सुख और समृद्धी भारत की संस्कृती विश्व की प्राचीन संस्कृति मानी जाती है। भारत के प्राचीन समय में गणित, भौतिकशास्त्र, कला, वाणिज्य, रसायनशास्त्र आदि शास्त्रों में प्रगति की थी। भारत के विवध धर्मों की परंपराए उनका साहित्य भी विशाल है। सुजलाम सुफलाम ऐसी हमारी भूमि है। यहींपर उन्नीसवीं सदी मे हरितक्रांती हुई थी।

धरती सुनेहरी अंबर नीला
हर मौसम है रंगीला
ऐसा देश है मेरा

औद्योगिक क्षेत्र में भी भारत ने काफी तरक्की कर ली है। महाराष्ट्र की राजधानी मुंबई भारत की "औद्योगिक राजधानी" मानी जाती है। आज अवकाश, विज्ञान, साहित्य जैसे कई क्षेत्रों में भारत का नाम प्रगति के पथपर है और हम सिर्फ भौतिक रुप सेही नही, दिल से, मन से भी उतनेही बडे है। भारत में अलग-अलग जाती के, धर्मों के, भाषा के लोग रहते है। लेकिन सभी भाई-भाई की तरह मिल जुलकर रहते है। 'विविधता मे एकता' यही भारत की पहचान है। लेकिन खूबसूरत चाँद को भी जैसे ग्रहण लगता है। उसी तरह हमारे भारत की प्रगति को भी ग्रहण लगा है, बढती हुई आबादी, बेरोजगारी और गरीबी का। इसलिए भारत सोने की चिडियाँ यह उक्ति हमें एक कल्पना लगने लगी है।

